cmyk

A

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९७ | सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अर्थसंकल्पीय अधिवेशन : राजकीय वादळात अजित पवारांच्या उणीवेची जाणीव

२३ फेब्रुवारीपासून सुरू होणारे राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे केवळ आर्थिक तरतुदींचे दस्तऐवजीकरण नसून, सध्याच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वास्तवाचे प्रतिबिंब ठरणार आहे. सन २०२६–२७ साठीचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर होणार असून, कनिष्ठ सभागृहात (विधानसभा) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर वरिष्ठ सभागृहात (विधानपरिषद) मंत्री आशिष जयस्वाल हे अर्थसंकल्प मांडतील. मात्र, या अधिवेशनावर सर्वाधिक ठसा उमटवणारी बाब म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाणवणारी उणीव.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात आज राज्यभर आंदोलन

## परभणी जिल्ह्यात पोलिसांकडून शेतकऱ्यांवर झालेल्या अत्याचाराचा निषेध

कोल्हापूर । प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर झालेल्या पोलिसी अत्याचाराच्या निषेधार्थ आणि शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी सोमवारी (दि. २३) राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या राज्यव्यापी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. विधानसभेच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे, धरणे, निदर्शने व रास्ता रोको आंदोलने होणार आहेत.

या महामार्गाच्या विरोधातील आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने शनिवारी राज्यव्यापी ऑनलाइन



बैठक झाली होती. माजी खासदार राजू शेट्टी, आमदार सतेज पाटील, कैलास पाटील, माजी आमदार राजेश पाटील, ऋतुराज संजय पाटील आदी नेत्यांनी या बैठकीत भाग घेतला आणि राज्यभर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपताच सरकारने या महामार्गास असलेला शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्याचा प्रयत्न सुरू केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

परभणीतील सहजपूर व जवळा गावांमध्ये महिला व शेतकऱ्यांवर झालेल्या कथित अमानुष वागणुकीचा निषेध राज्यातील नेते आणि शेतकऱ्यांकडून केला जात आहे. विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी हा महामार्ग अनावश्यक असून, कंत्राटदारांच्या हितासाठी रेटला जात असल्याचा ▶▶ पान २ वर

### सांगलीत निघणार मोर्चा


शक्तिपीठ महामार्गाने बाधित सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या महामार्गाविरोधात सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. कवलापूर (ता. मिरज) येथील सिद्धेश्वर मंदिरात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. ट्रॅक्टर, बैलगाड्या, कुटुंबीयांसह मोर्च्यात सहभागी होणार असल्याचे आंदोलकांनी या वेळी स्पष्ट केले. या बैठकीस परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांगलीतील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यापासून मोर्चा सुरू होईल.

# आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

## विरोधकांचा चहापानावर बहिष्कार, विधानसभा अध्यक्षांचे वर्तन घटनाबाह्य असल्याची टीका

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभाराचा आणि जनविरोधी धोरणांचा निषेध करत, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने आयोजित केलेल्या अधिकृत चहापानावर महाविकास आघाडीने बहिष्कार टाकला. मंत्रालयात उघडपणे सुरू असलेले 'लक्ष्मीदर्शन', शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आणि घटनात्मक पदांचा होणारा अवमान या मुद्यांवरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे.**



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, अनिल परब, अजय चौधरी, सुनील प्रभू उपस्थित होते. तर काँग्रेस पक्षाकडून विजय वडेट्टीवार,सतेज पाटील अमीन पटेल आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून माजी आमदार मिलिंद कांबळे उपस्थित होते. विजय वडेट्टीवार याबाबत म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू हा घातपात की अपघात याबाबत राज्यात अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत सरकारची भूमिका संदिग्ध आहे. अजित दादा यांच्या मृत्यूनंतर शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. इतकी घाई कुणाला होती? जर ही प्रक्रिया योग्य होती तर मुख्यमंत्र्यांनी स्थगिती का दिली असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला. राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. जानेवारी महिन्यात एकट्या मराठवाडयात ७६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सर्वाधिक २४ शेतकऱ्यांनी बीड जिल्ह्यात आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी कर्जमाफीबाबत सरकारचे धोरण नाही, शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही. राज्यात झालेल्या ▶▶ पान २ वर

# नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता देवजीने गुडघे टेकले

गडचिरोली । प्रतिनिधी

देशातील नक्षलवादी चळवळीचा कणा समजला जाणारा आणि सुरक्षा यंत्रणांच्या हिटलिस्टवर असलेला सर्वोच्च जहाल नक्षलवादी नेता आणि नक्षल संघटनेचा महासचिव थिप्परी तिरुपती ऊर्फ देवजी याने आपला खंदा समर्थक आणि सीसीएम सदस्य संग्राम याच्यासह तेलंगणा पोलिसांसमोर गुडघे टेकल्याची माहिती आहे. नक्षल चळवळीच्या इतिहासातील हा आतापर्यंतचे हे सर्वोच्च आत्मसमर्पण मानले जात आहे. नक्षल्यांचा सर्वोच्च नेता नेता बसवाराजूच्या खात्म्यानंतर लाल साम्राज्याची संपूर्ण सूत्रे देवजीच्या हातात आली होती. केवळ छत्तीसगड मध्येच त्याच्यावर १.५ कोटी रुपयांचे इनाम आहे, तर संग्रामवर १ कोटींचे बक्षीस आहे. गेल्या चार दशकांपासून पोलिसांना गुंगारा देणारा हा मास्टरमाईंड ढासळत्या प्रकृतीमुळे किंवा संघटनेत सुरू असलेल्या अंतर्गत फुटीमुळे शरण आल्याचे बोलले जात आहे. यास वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्चपूर्वी बस्तर नक्षलमुक्त करण्याचा ▶▶ पान २ वर

# भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात काँग्रेसचा एल्गार

## देशभर किसान संमेलनांची घोषणा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



**भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराविरोधात काँग्रेस पक्ष देशभरात किसान संमेलनाचे आयोजन करणार आहे. महाराष्ट्रातील यवतमाळसह मध्य प्रदेशात भोपाळ आणि राजस्थानच्या श्री गंगानगर येथे या संमेलनांचे आयोजन केले जाणार आहे.**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत या संमेलनाची रणनीती ठरवण्यात आली. या बैठकीला खर्गे यांच्यासह लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, संघटन सरचिटणीस के. सी . वेणुगोपाल, ▶▶ पान २ वर

### सरकारकडून विश्वासघात–सपकाळ

बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अमेरिकेसोबत केलेला व्यापार करार रद्द करण्याची आवश्यकता आहे, मनरेगा पुन्हा सुरू केली पाहिजे. पंतप्रधान मोदींनी देशासोबत विश्वासघात केला, शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचे आणि अर्थव्यवस्था बुडवण्याचा हा प्रयत्न आहे. या विरोधात जनतेचा रेटा निर्माण झाला पाहिजे.

# शरद पवार यांच्या यशस्वी कारकिर्दीवर सुनेत्रा पवार यांची पोस्ट

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे लाडके जाणते राजे म्हणून ओळखले जाणारे नेते अर्थात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांच्या सार्वजनिक आणि संसदीय राजकारणाला २२ फेब्रुवारी १९६७ साली सुरुवात झाली. त्यास रविवारी ६० वर्षे पूर्ण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी एक खास पोस्ट लिहित हीच यशाची खरी ताकद असल्याचे सांगत शरद पवार यांच्या राजकिय कारकिर्दीचे कौतुक केले.**

पोस्ट लिहिताना सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या की, १९६७ पासून सुरु झालेला प्रवास आजही तितक्याच उर्जेने आणि निष्ठेने पुढे जात आहेत.



महाराष्ट्र विधानसभेपासून ते संसद भवनापर्यंतच्या विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने जनतेचा विश्वास संपादन केला. या दिर्घ वाटचालीत त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहिलेले कार्यकर्ते, सहकारी, आणि सर्वात महत्वाचे ▶▶ पान २ वर

# महादेव मुंडे यांच्या मुलाला मारहाण, आरोपी कराड समर्थक?

बीड । प्रतिनिधी

**बीडच्या परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाला दोन वर्षे पूर्ण झाले. मात्र अद्याप त्यांचे आरोपी सापडले नाहीत. असे असतानाच आता महादेव मुंडे यांचा मुलगा ट्यूशन वरून घराकडे येत असताना सोमेश्वर नगर भागामध्ये त्याला मारहाण करण्यात आली.**

एका व्यक्तिने मुलाला अडवून 'तू कोणाचा आहे' असे विचारले आणि त्याने 'मी महादेव मुंडे यांचा मुलगा आहे' असे सांगताच त्याला मारहाण केली. दरम्यान, मारहाण करणारा बालाजी आघाव वाल्मिक कराडचा समर्थक असल्याचे समोर आले आले. ▶▶ पान २ वर

# भारत–अमेरिका व्यापार कराराला तुर्तास ब्रेक; ट्रम्प यांच्या 'या' भूमिकेमुळे वाटाघाटींची बैठक लांबणीवर

दिल्ली । वृत्तसंस्था

भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित असलेल्या अंतरिम व्यापार कराराच्या वाटाघाटींना तुर्तास ब्रेक लागला आहे. वॉशिंग्टन येथे सोमवारपासून (२३ फेब्रुवारी) सुरू होणारी दोन्ही देशांच्या वाटाघाटी समितीची तीन दिवसीय बैठक अनपेक्षितपणे लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्काबाबत घेतलेले नवे निर्णय आणि अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल, या पार्श्वभूमीवर ▶▶ पान २ वर




# राज्यात आरटीई प्रवेशाच्या जागांमध्ये मोठी घट

## ३२५ शाळा आणि १३ हजार २५५ जागा आरटीई प्रवेश प्रक्रिये बाहेर

पुणे । प्रतिनिधी

**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत दिल्या जाणाऱ्या २५ टक्के राखीव प्रवेश जागांमध्ये गेल्या नऊ वर्षांत लक्षणीय घट झाली आहे. राज्यात २०१८–१९ ते २०२६–२७ या कालावधीत ३२५ शाळा आणि १३ हजार २५५ जागा आरटीई प्रवेश प्रक्रियेबाहेर गेल्याने सामाजिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांच्या संधी कमी झाल्या आहेत.**

२०१८–१९ मध्ये ८,९८० शाळांमधून १ लाख २६ हजार १४० जागा उपलब्ध होत्या. २०२६–२७ साठी ही संख्या ८,६५५ शाळा आणि १ लाख १२ हजार ८८५ जागांपर्यंत घसरली आहे. विनाअनुदानित खासगी शाळांचा आरटीई प्रक्रियेतील सहभाग कमी होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर आणि २५ टक्के आरक्षण पालक सभेच्या अध्यक्षा सुरेखा खरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती मांडली. तसेच, भाषिक अल्पसंख्याक शाळांमध्ये किमान ५१ टक्के विद्यार्थी संबंधित भाषिक




गटातील आहेत का, याची पडताळणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. आरटीई प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू करावी आणि प्रक्रियेबाबत दरवर्षी निर्माण होणारी ▶▶ पान २ वर

### नामांकित शाळा 'आरटीई'बाहेर?

शासनाकडून शुल्क प्रतिपूर्ती वेळेत होत नसल्यामुळे अनेक शाळा आरटीईपासून दूर जात आहेत. काही शाळांनी अल्पसंख्याक दर्जा घेतल्याने त्या आरटीईच्या कक्षेबाहेर गेल्या आहेत. पुण्यातील काही नामांकित शाळांची नावे २०२६–२७ च्या यादीत नसल्याने पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे, असा मुद्दाही या पत्रकार परिषदेत मांडण्यात आला.

## थोडक्यात...

### दुबे यांच्या मुंबईवरील विधानाने पुन्हा वाद

नवी दिल्लीः भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा एकदा मुंबई आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर भाष्य केले आहे. जर बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड नसेल तर मुंबईने काय पाहिले असते? असा सवाल दुबे यांनी उपस्थित केला. त्याशिवाय डुबे डुबे कर मारेंगे या राज ठाकरेंनी दिलेल्या धमकीनंतर मी ४ वेळा मुंबईत आल्याचा दावाही निशिकांत दुबे यांनी केला आहे. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी म्हटले की, बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, बंगालचे लोक मुंबई, महाराष्ट्रात जातात आणि महाराष्ट्रात विशेषत: मुंबईतील लोकांना वाटते हे लोक आमचा हिस्सा घेत आहेत. बिहारी कब्जा करताहेत असे त्यांना वाटते. आम्ही या देशातले सर्वात मोठे करदाते आहोत. जर मुंबई आणि महाराष्ट्र नसेल तर कदाचित देश चालणार नाही असेच कित्येक वर्षाच्या आंदोलनाचे कारण आहे. ही लढाई आहे असे त्यांनी सांगितले.

### लाल किल्ला आणि मंदिरे निशाण्यावर

नवी दिल्लीः दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ला आणि प्रमुख मंदिरांना लक्ष्य करण्याच्या दहशतवादी कटाचा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिल्यानंतर, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधून आठ संशयितांना अटक करण्यात आली आहे. या संशयितांचे पाकिस्तानची गुप्तचर संस्था आणि बांगलादेशातील कट्टरपंथी गटांशी संबंध असल्याचा आरोप आहे. दरम्यान, सुरक्षा यंत्रणांनी राजधानीत हाय अलर्ट जारी केला आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी सहा जणांना तामिळनाडूतील उथुकुली, पल्लाडम आणि थिरुमुरुगनपुंडी या भागांतून ताब्यात घेण्यात आले, तर इतर दोघांना पश्चिम बंगालमधून पकडण्यात आले. एएनआय या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, अटक करण्यात आलेल्यांपैकी काही जण बांगलादेशी नागरिक असण्याची शक्यता आहे.

### देशातील ३२ विद्यापीठ बोगस, महाराष्ट्रात दोन

नवी दिल्लीः देशात बोगस आणि बनावट विद्यापीठांचा मोठा खुलासा झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने संपूर्ण देशातील ३२ विद्यापीठांना बोगस घोषित केले आहे. या शैक्षणिक संस्थेत डिग्री घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि पुढील शिक्षण नाकारले जाईल असे आयोगाने स्पष्ट केले. यूजीसीने विद्यार्थ्यांना कुठल्याही कॉलेज अथवा विद्यापीठात प्रवेश घेण्यापूर्वी त्याची मान्यता तपासण्याचे आवाहन केले आहे. या ३२ विद्यापीठांना केंद्र सरकार, राज्य सरकारकडून कुठलीही मान्यता मिळाली नसल्याचे आयोगाने म्हटले आहे. यूजीसीच्या या ३२ बोगस विद्यापीठांच्या यादीत महाराष्ट्रातील २ विद्यापीठांचा समावेश आहे. त्यात नागपूर येथील राजा अरबी विद्यापीठ आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठाचा समावेश आहे.

### पाकचा अफगाणिस्तानवर एअर स्ट्राईक

कराचीः पाकिस्तानने अफगाणिस्तान सीमेजवळ दहशतवाद्यांच्या तळांवर एअर स्ट्राईक केला आहे. पाकिस्तानमधील अलीकडील आत्मघाती हल्ल्यांसाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांच्या ठिकाणांना या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आल्याचा दावा पाकिस्तानने केला. या एअर स्ट्राईकमध्ये १९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. सोशल मीडियावरील रिपोर्ट्सनुसार, हे हल्ले अफगाणिस्तानच्या हद्दीत झाले आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः २१.०० क्विंटल | २,१०० | २,७९९ | २,४६९ |
| ज्वारी/हायब्रिड : ३१.५० क्विंटल | २,००० | ४,१९१ | ३,११५ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २५.०० क्विंटल | ६,२७१ | ७,८०१ | ७,१८९ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ५,७०० | ६,००० | ५,८५० |
| बाजरीः ८.५० क्विंटल | १,८०० | २,७९१ | २,३८४ |
| मुगः १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीनः ३९.५० क्विंटल | ५,२०० | ५,३०० | ५,२५० |
| हरभराः ३२.०० क्विंटल | ५,००० | ५,०८० | ५,०२९ |

cmyk

## अग्रलेख

# अर्थसंकल्पीय अधिवेशन : राजकीय वादळात अजित पवारांच्या उणीवेची जाणीव

२३ फेब्रुवारीपासून सुरू होणारे राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे केवळ आर्थिक तरतुदींचे दस्तऐवजीकरण नसून, सध्याच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वास्तवाचे प्रतिबिंब ठरणार आहे. सन २०२६-२७ साठीचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर होणार असून, कनिष्ठ सभागृहात (विधानसभा) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर वरिष्ठ सभागृहात (विधानपरिषद) मंत्री आशिष जयस्वाल हे अर्थसंकल्प मांडतील. मात्र, या अधिवेशनावर सर्वाधिक ठसा उमटवणारी बाब म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाणवणारी उणीव.

या अधिवेशनात सत्ताधाऱ्यांना अनेक संवेदनशील प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच राज्यातील अल्पसंख्याक संस्थांना प्रमाणपत्र वाटप झाल्याच्या प्रकरणाने प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्याचबरोबर मुलुंडमधील मेट्रो दुर्घटना, मंत्र्यांच्या दालनात उघड झालेली लाचखोरी, तसेच अधिवेशनाच्या तोंडावर मुस्लिम समाजाचे पाच टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णयया सर्व मुद्द्यांवर विरोधक सभागृहात सरकारला धारेवर धरणार, हे स्पष्ट आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन हे परंपरेने विकास आराखड्यांचे आणि कल्याणकारी योजनांचे सादरीकरण करण्याचे व्यासपीठ असते; मात्र यंदा ते राजकीय संघर्षाचे रणांगण ठरण्याची चिन्हे आहेत. सरकारच्या धोरणांमागील भूमिका, निर्णयांची वेळ आणि पारदर्शकता यावर तीव्र चर्चा अपेक्षित आहे.

सत्ताधाऱ्यांना जसे प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे, तसेच विरोधकांनाही आत्मपरीक्षण करावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील अपयश, महापौर निवडणुकीतील घडामोडी आणि राज्यसभेच्या निवडणुकीवरून निर्माण झालेला अंतर्गत कलह या पार्श्वभूमीवर विरोधकांची एकजूट आणि विश्वासार्हता कसोटीवर लागणार आहे. केवळ सरकारवर टीका करून चालणार नाही; तर पर्यायी धोरणात्मक दृष्टीकोनही मांडावा लागेल. गेल्या साडेतीन दशकांपासून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात ठसा उमटवणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार. ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. अर्थसंकल्प मांडताना आकडेवारीचे सखोल आकलन, विरोधकांच्या प्रश्नांना तात्काळ उत्तर देण्याची तयारी आणि प्रशासनावरची पकड या सर्व गुणांनी त्यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली होती. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्प जरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सादर करीत असले, तरी सभागृहात अजित पवारांची उणीव प्रकर्षाने जाणवणार आहे. अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होईल आणि त्यानंतर अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला जाईल. आमदार त्यांच्या आठवणींना उजाळा देतील. त्याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा परिचय सभागृहाला करून देतील ही एक राजकीय आणि भावनिक क्षणांची सांगड असेल.

यंदाच्या अधिवेशनात केवळ महसूल तूट, भांडवली खर्च किंवा कल्याणकारी योजनांची आकडेवारी चर्चेत राहणार नाही; तर प्रशासनातील पारदर्शकता, सामाजिक न्याय, सुरक्षा आणि राजकीय स्थैर्य हे व्यापक प्रश्नही केंद्रस्थानी असतील. आर्थिक वाढीबरोबर सामाजिक समतोल राखणे, विकासासोबत विश्वास जपणे आणि सत्ताधाऱ्यांनी उत्तरदायित्व स्वीकारणेही अपेक्षा राज्यातील जनतेची आहे. अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा तक्ता नसतो; तो सरकारच्या प्राधान्यक्रमांचा आरसा असतो. त्यामुळे या अधिवेशनात सरकारने केवळ राजकीय आघातांना उत्तर देण्यापेक्षा लोकहिताच्या ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना मांडणे गरजेचे आहे. विरोधकांनीही केवळ घोषणाबाजी न करता विधायक भूमिका घ्यावी. राज्याच्या राजकारणात निर्माण झालेल्या पोकळीतून नवे संतुलन निर्माण करण्याची हीच वेळ आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन राज्याच्या भवितव्याची दिशा ठरवणारे ठरेलही जाणीव सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनीही ठेवणे आवश्यक आहे.

# ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे २४ फेब्रुवारी रोजी ‘एक टाका दुर्बिणीने’ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिर

## महिलांनी संधीचा लाभ घ्यावा-डॉ. रामदास मोराळे

**आष्टी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील महिलांच्या आरोग्य संरक्षणासोबतच कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे मंगळवार,दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी ‘एक टाका दुर्बिणीने’ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी दिली.**

हे शिबिर आधुनिक दुर्बिण (लॅप्रोस्कोपी) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पार पाडण्यात येणार असून, या पद्धतीत अत्यल्प वेळेत आणि कमी वेदनेत शस्त्रक्रिया पूर्ण होते. या प्रक्रियेत फक्त एक छोटासा टाका देऊन शस्त्रक्रिया केली जाते, त्यामुळे महिलांना लवकर आराम मिळतो तसेच रुग्णालयात जास्त काळ राहण्याची गरज भासत नाही. या शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार असून, सर्व शस्त्रक्रिया सुरक्षित व शासकीय नियमानुसार मोफत करण्यात येणार आहेत. शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधे, तपासण्या व मार्गदर्शनही रुग्णालयामार्फत विनामूल्य देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर आर्थिक लाभही देण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.कुटुंब नियोजनामुळे माता व बालकांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते, तसेच कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासही हातभार लागतो. त्यामुळे दोन अपत्यांनंतर कुटुंब पूर्ण झालेल्या महिलांनी या आधुनिक व सुरक्षित शस्त्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. रामदास मोराळे यांनी केले आहे.या शिबिरात सहभागी होण्यासाठी इच्छुक महिलांनी आपल्या जवळच्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका किंवा ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे संपर्क साधावा.अधिकाधिक महिलांनी या संधीचा लाभ घेऊन कुटुंब नियोजनाबाबत सकारात्मक पाऊल उचलावे, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# चिंचोटी येथे शिवाजी महाराज जयंती निमित्त महिलांच्या हस्ते महापुरुषांच्या चौकात ध्वजारोहण

## विद्यार्थ्यांच्या वेशभुषा ठरल्या मुख्य आकर्षक

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उस्ताहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.यावेळी गावातील सर्व महापुरुषांच्या चौकात जिल्हा परीषद प्राथमीक शाळेत महिलांच्या शुभहस्ते ध्वजारोहण व प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी गावातील लहान थोर महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.**

शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या परीधान केलेल्या वेशभुषा सर्वांचे लक्ष वेधुन घेत होत्या. तालुक्यातील चिंचोटी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक,डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या महापुरुषांच्या चौकांची स्वच्छता करून आकर्षक रांगोळी काढत महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन गावातील उपस्थीत महीलांच्या शुभ हस्ते करण्यात आले.त्यानंतर सामुदायिक जिजाऊ वंदना घेण्यात आली.जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज माँ जिजाऊ,शिवबांचे मावळे यांच्या वेशभूषा परिधान केलेल्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.संपूर्ण गावात फेरी काडण्यात आली.शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्ती गाण्यावर लेझीम जबरदस्त डान्स व काठीचा लेझर शो सादर करण्यात आला.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी माँ जिजाऊ,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवन पटला विषयी जबरदस्त भाषने करत उपस्थीतांकडुन टाळ्यांचा कडकडाट मिळवला. छत्रपती शिवाजी महाराज,माँ जिजाऊ,आण्णाभाऊ साठे संभाजी महाराज,डॉ बाबासाहेब आंबेडकर अदी महापुरुषांच्या जय घोषाने परिसर दणाणून गेला होता.या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांसह गावातील लहान थोर महिला पुरुष मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# सुरुडी आश्रमशाळेत शिवजन्मोत्सव साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रकल्प अधिकारी चेतना मोरे, सहाय्यक प्रकल्पाधिकारी डॉ. उद्धव वायाळ, गजानन बनसोडे यांच्या प्रेरणेने मुख्याध्यापक सुधाकर राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रकाश काडलिंगे, केतन काकडे यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम राबविण्यात आले.**

आकर्षक फलक लेखन केले, महाराजांची देखणी रांगोळी, विद्यार्थ्यांच्या सहकार्याने शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती इ उपक्रम राबवण्यात आले. विद्यार्थिनींनी ‘शिवबांचा पाळणा’ व नामकरण सोहळा सादर केला. यानंतर दुर्गपूजन करून शिवबांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन व भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवजन्मोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराजांच्या मिरवणुकीसाठी शाळेत घोडा आणण्यात आला होता. कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाराजांची घोड्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधाकर राठोड, प्रकाश काडलिंगे, राजेंद्र कांबळे, केतन काकडे, गोकुळ शिंदे, संगीता जाधव, भगवान बागुल, अमित पवार, विलास देवतुळे, मदन सावंत, स्वाती मळघणे, वेणूबाई केसकर, मोहन जाधव, संदीप ढेपे, संदीप पानबुडे, काशिनाथ खुडे, वंदना पानबुडे, पुण्यरथा खुडे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पंचाळेश्वर महादेव शिवरात्री महोत्सवाची डॉ.गणेश महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता

**बीड । प्रतिनिधी**

**जगातील विषमता नष्ट व्हावी, यासाठी संतांनी प्रेमभावे सेवा केली. संतांचे समाजावर अनंत उपकार आहेत. समाजाच्या उद्धारासाठी संतांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. संतश्रेष्ठ भगवानबाबा वामनभाऊ महाराज आदी संतांनी समाज उद्धाराचे कार्य केले. वारकरी संप्रदायातील काला म्हणजे समता, ऐक्याचे आणि एकात्मतेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन ह.भ.प डॉ. गणेश महाराज बडे यांनी केले.**




गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील शिवरात्री महोत्सवाची सांगता दुर्गाशक्ती गडाचे मठाधिपती ह. भ.प. डॉ. गणेश महाराज बडे यांच्या काल्याच्या कीर्तनांने झाली. यावेळी काल्याच्या कीर्तनात डॉ. गणेश महाराज शास्त्री बोलत होते. डॉ.गणेश महाराज शास्त्री यांनी आपल्या विद्युतापूर्ण कीर्तनात अध्यात्मा बरोबरच शिक्षणाचे महत्त्व आणि डिजिटल युगातील संगणकाचे महत्व सांगितले. यावेळी त्यांनी विविध दृष्टांत देऊन अभ्यासपूर्ण कीर्तन केले. या शिवरात्री महोत्सवात युवा कीर्तनकार ह.भ.प. कैलास महाराज खेडकर यांची शिवलीलामृत कथा संपन्न झाली. तर ह.भ.प.वैभव महाराज जगताप यांचे कीर्तन, धुराजी महाराज कोळेकर, यांचे कीर्तन, ह.भ.प. शिवाजी महाराज फुंदे, फुंदेटाकळी यांचे मंत्रमुग्ध करणारे कीर्तन झाले. काल्याच्या कीर्तनास मृदंगाचार्य म्हणून ह.भ.प. कैलास महाराज खेडकर, गायनाचार्य ह.भ.प. अंगद महाराज निंबाळकर, गौतम महाराज गुंजाळ, ताराचंद महाराज गुंजाळ, भगवान महाराज घाडगे, विठ्ठल महाराज खेडकर, प्रदीप महाराज खेडकर, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमास कीर्तनकार तथा गावचे भूमिपुत्र ह.भ.प. सखाराम महाराज तांगडे, ह.भ.प. सुमित महाराज, नारायण नागरे, माऊली खरे, संजय सानप, नारायण घाडगे, अंकुश सोनवणे, आदींसह रोकडेश्वर भजनी मंडळ, कबीरपंथी भजनी मंडळ, टाळकरी, गायनाचार्य, भाविक सहभागी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भव्य- दिव्य संपन्न झालेल्या शिवरात्री महोत्सव कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ह.भ.प. कैलास महाराज, विष्णू खेडकर, राजु नागरे, सतीश खेडकर, पांडुरंग नागरे, आदींनी परिश्रम घेतले.



# विडोळीची शिक्षण परिषद उत्साहात

**मंठा । प्रतिनिधी**

**समूह साधन केंद्र विडोळीची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद २१ फेब्रुवारी,२०२६ रोजी जि.प.प्रा.शाळा, वांजोळा येथे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, गट समन्वयक के.जी.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली समूह साधन केंद्र समन्वयक डी. ए. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**

निपुण महाराष्ट्र अभियान, पालक व शाळा व्यवस्थापन समिती सहभाग तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पाटोदा व लिंबेवडगाव येथील शिक्षकांनी शाळेच्या गुणवत्तेबाबत अनुभव सादर केले. याशिवाय डॉ. जयंत नारळीकर अध्ययन समृद्धी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या लिंबेवडगावचे एस.बी.ठाकूर, नानसीचे मुख्याध्यापक के. एम.खरात, पाटोद्याचे जी.वाय.वानोळे, वांजोळ्याच्या श्रीमती एस.डी.खर्चे बोराडे, पाटोद्याचे संग्राम तोगरे या शिक्षकांचा केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण यांनी विशेष सत्कार केला. शिक्षण परिषदेस मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, मुख्याध्यापक शिवहार चिंचोलकर, किसन जयस्वाल यांच्यासह केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

## पान १ वरून...

### शक्तिपीठ महामार्गाविरोधात

आरोप केला आहे. माजी खासदार शेट्टी यांनी महामार्गात मोठ्या भ्रष्टाचाराचा आरोप करत सरकारला प्रकल्प रद्द करावाच लागेल, असा इशारा दिला आहे. कैलास पाटील यांनी महामार्गाविरोधात ग्रामसभांचे नव्याने ठराव घेण्याचे आवाहन केले आहे तर संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे यांनी परभणीतील घटनांची तुलना ब्रिटिशकालीन दडपशाहीशी केली आहे. दरम्यान, विधानसभेच्या अधिवेशन काळात मुंबईत बाधित शेतकरी व नागरी संघटनांची गोलमेज परिषद आयोजित करण्याचा, तसेच राज्यभर ग्रामसभांमधून महामार्गविरोधी ठराव घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------

### नक्षलवाद्यांचा सर्वोच्च

विडा उचलला आहे. याच पार्श्वभूमीवर देवजीचे शरण येणे हा नक्षलींसाठी ‘डेथ वॉरंट’ ठरू शकतो.

-------------

### आजपासून अर्थसंकल्पीय

अतिवृष्टीसाठी केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवूनही अजूनही राज्य सरकारला निधी मिळालेला नाही असा आरोप करत महाराष्ट्रातील शेतकरी सावकारांच्या पाशात अडकला आहे. चंद्रपूर येथील शेतकऱ्याला किडनी विकण्याची वेळ आली असे विदारक चित्र महाराष्ट्रात असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. शिवसेना उबाठाचे भास्कर जाधव म्हणाले की, मंत्रालयात थेट लक्ष्मीदर्शन सुरू असून, एसीबीने धाड टाकली. मंत्री झिरवळ यांच्या पीएला अटक करण्यात आली. आणि अजूनही मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आलेला नाही. राज्यात उच्चपदस्थ मंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीच्या ड्रग फॅक्टरी वर पोलिसांनी धाड टाकली पण त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. मंत्री संजय शिरसाठ, योगेश कदम यांच्याविरोधात पुरावे देऊन देखील सरकार कारवाई करत नसल्याने त्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकत असल्याचे सांगत राज्यात वीजदर कमी करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केले होते. पण महावितरणने वीजदरवाढीचा प्रस्ताव दिलेला आहे. जनतेची ही फसवणूक असल्याची टीका शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी केली. आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःला इन्फ्रामॅन म्हणून स्वतःचे मार्केटिंग करत आहे पण मुलुंड मध्ये मेट्रोमधील स्लॅब कोसळून एकाच मृत्यू झाला. एमएमआरडीने बांधलेला पूल हा आठवे आश्चर्य मानावे लागेल. शहरात लोकांनी जगायचे कसे.? रस्त्यावर चालताना मृत्यू, विधानसभा अध्यक्षांची दादागिरी सुरू आहे. महायुतीचे बहुमताचे सरकार असूनही त्यांना विरोधी पक्षाची भीती का आहे असा सवालही यावेळी त्यांनी केला. काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी स्पष्ट विरोध केला तरी जमीन मोजणीचे काम सरकारने सुरू केले आहे. परभणी इथे तर शेतकऱ्यांना मारहाण करण्यात आली. त्यामुळे हा महामार्ग कंत्राटदारासाठी शेतकऱ्यांवर थोपवला जात असल्याचा गंभीर आरोप सतेज पाटील यांनी केला.

-------------

### शरद पवार यांच्या यशस्वी कारकिर्दीवर

म्हणजे जनतेची साथ, हीच त्यांच्या यशाची खरी ताकद आहे. पवार साहेबांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा आगामी काळातही सर्वांना नवी ऊर्जा देत राहो, असे सांगत त्यांनी सदिच्छा व्यक्त केली आहे. सुनेत्रा पवार यांच्याबरोबरच शरद पवार यांच्या कन्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनीही एक्सवर पोस्ट लिहित म्हणाल्या की, शरद पवार यांच्या सार्वजनिक आणि संसदीय राजकारणास ६० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे अनेकांनी शुभेच्छा दिल्या. या सहा दशकांच्या काळात कित्येक महत्वाच्या घडामोडींचे ते साक्षीदार आहेत. महाराष्ट्र विधानसभेचे त्यांनी सहा वेळा तर एकदा विधान परिषदेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. तसेच तब्बल सात वेळा लोकसभेवर निवडूण गेले तर दोन वेळा राज्यसभेवर प्रतिनिधीत्व केले. १९६७ साली सुरु झालेला हा अविजीत प्रवास आजही अव्याहतपणे सुरु आहे. या संपूर्ण प्रवासात त्यांच्यासोबत त्यांच्या जीवाभावाचे सोबती, कार्यकर्त्ये आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मायबाप जनता ठामपणे उभी राहिली, जनतेने त्यांच्यावर अलोट प्रेम केले. प्रचंड विश्वास टाकला, या विश्वासाच्या बळावरच हा प्रवास शक्य झाला आहे. या बद्दल सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार अशा भावना सुळे यांनी व्यक्त केल्या.

-------------

### भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात

महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, राज्यसभा खासदार रजनी पाटील यांच्यासह जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थानचे प्रदेशाध्यक्ष आणि विधिमंडळ पक्षाचे नेते उपस्थित होते. बैठकीत भारत-अमेरिका व्यापार करारावर चर्चा झाली. या व्यापार कराराचा परिणाम या सहा राज्यांमधील कापूस, सोयाबीन, मका शेतकरी आणि फळे आणि काजू उत्पादकांवर होईल, अशी माहिती माध्यम सरचिटणीस जयराम रमेश यांनी बैठकीनंतर दिली. किसान संमेलनात काँग्रेस अध्यक्ष खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी सहभागी होतील, असे त्यांनी सांगितले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, पंतप्रधान मोदी यांनी शरणागती पत्करल्याची टीका केली. या व्यापार कराराचा देशातील शेतकऱ्यांवर नकारात्मक परिणाम होईल. म्हणून, पहिल्या टप्प्यात, आम्ही सहा राज्यांमधील शेतकरी संघटनांसोबतच्या व्यापार कराराविरुद्ध आवाज उठवू, असे जयराम रमेश म्हणाले.

----------

### भारत-अमेरिका व्यापार कराराला तुर्तास

दोन्ही देशांनी हा सावध पवित्रा घेतला आहे. या बैठकीसाठी वाणिज्य मंत्रालयातील सहसचिव दर्पण जैन यांच्या नेतृत्वाखालील पथक अमेरिकेला रवाना होणार होते. मात्र, सध्याच्या बदलत्या घडामोडींचा आणि त्यांच्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यासाठी अधिक वेळ आवश्यक आहे. त्यामुळे परस्पर संमतीने ही बैठक काही काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे, असे वाणिज्य मंत्रालयातील सूत्रांनी स्पष्ट केले आहे. यापूर्वीच भारत आणि अमेरिका यांच्यात एका फ्रेमवर्कवर सहमती झाली होती, ज्यानुसार अमेरिका भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क १८ टक्क्यांपर्यंत खाली आणणार आहे. सध्या भारताला काही वस्तूंवर २५ टक्क्यांपासून ते ५० टक्क्यांपर्यंत दंडात्मक शुल्क सोसावे लागत आहे. २०२४-२५ या वर्षात दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १८६ अब्ज डॉलर्सवर पोहोचला असून, अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी हा करार मार्चमध्ये पूर्ण होऊन एप्रिलपासून लागू होईल, असे संकेत दिले होते. या घडामोडींमागे अमेरिकेतील अंतर्गत कायदेशीर आणि आर्थिक पेच कारणीभूत असल्याचे मानले जाते. ट्रम्प प्रशासनाने विविध देशांवर लादलेले जागतिक आयात शुल्क अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवले होते. या निकालानंतर संतापलेल्या ट्रम्प यांनी शुक्रवारी सर्व देशांवर १० टक्के नवीन शुल्क लागू केले आणि शनिवारी त्यात वाढ करून ते १५ टक्के केले. ही नवी कररचना २४ फेब्रुवारीपासून लागू होणार आहे. याच पार्श्वभुमीवर होऊ घातलेली बैठक पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

--------------

### महादेव मुंडे यांच्या मुलाला

याप्रकरणी महादेव मुंडे यांच्या पत्नीने माझ्या मुलांना कराडच्या मुलांपासून धोका असून पोलिस संरक्षण मिळावे, अशी मागणी केली आहे. ही मारहाण का करण्यात आली, याची चौकशी आता परळी पोलीस करत आहेत.

-------------

### राज्यात आरटीई प्रवेशाच्या

अनिश्चितता दूर करण्यासाठी शासनाने कायमस्वरूपी धोरण जाहीर करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

--------

# जि.प.प्राथमिक शाळा जिवनापूर येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

**माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिवनापूर येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, शिवप्रेमी नागरिक तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर शाळेतील लहान विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनकार्यावर माहितीपर भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून त्यांचा इतिहासाविषयीचा अभ्यास व अभिमान स्पष्टपणे दिसून आला. मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर यांनी आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, स्वराज्याची संकल्पना, उत्तम प्रशासन व आदर्श नेतृत्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गाणे व विविध सादरीकरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाराजांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. बापूराव वाव्हळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता केली. अशा प्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिवनापूर येथे शिवजयंतीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

### रांगोळीच्या माध्यमातून अवतरले शिवराय; रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे. अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.





### छोटेवाडीत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी / रामनगर येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमतः शिवरायांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अंगदराव कटके हे होते तर उपसरपंच बाळासाहेब चव्हाण, ग्रामविकास अधिकारी डि. के. ताटे, डॉ. भानुदास रासवे, माजी सरपंच दिलीप राठोड, बाळासाहेब कटके, वैजनाथ कटके, दत्ता इंगळे, सुग्रीव सोळंके, योगेश प्रधान,भागवत इंगळे,श्रीकिशन कटके, सुखदेव चोरगे, हनुमान इंगळे, पंडित राठोड, दिनकर राठोड, प्रदीप धनवडे, हरिभाऊ चोरगे, नितीन प्रधान, शिवाजी कटके, भगवान बिडवे, उत्तरेश्वर इंगळे, दत्ता बागल, विनोद दळवी, दादाराव कटके, अरुण कटके, नितीन कटके, श्रीकृष्ण कटके, मोहन कटके, अंगद सोळंके, अर्जुन कटके, सर्जेराव कटके, अंकूश इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश सोळंके, राहुल मापाडे, अशोक माळेकर, शुभम प्रधान, अनुरुद्र सोळंके, अजित कटके, वैभव माळेकर, सौरव पांचाळ, राम प्रधान, सुशिल इंगळे, अमोल इंगळे ,भैय्या चोरगे यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंच प्रशासक

**राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय, सरपंच परिषदेत आनंदोत्सव, प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या पाठपुराव्याला यश**

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांचीच नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, 'सरपंच परिषद, मुंबई महाराष्ट्र'च्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. सरपंच परिषद प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत.



राज्यातील तब्बल १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर प्रशासक नियुक्तीचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून संधी द्यावी, अशी ठाम भूमिका सरपंच परिषदेकडून मांडण्यात आली होती. यासाठी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच न्यायालयीन स्तरावरही लढा देण्यात आला.

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाने काढलेल्या राजपत्रानुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचांना 'प्रशासक' म्हणून कामकाज पाहण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना 'प्रशासकीय समिती' म्हणून अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे गावपातळीवरील विकासकामांना गती मिळणार असून, प्रशासकीय अडथळे दूर होणार आहेत.

या निर्णयामुळे अनुभवी आणि गावच्या परिस्थितीची पूर्ण माहिती असलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गावाचा कारभार अधिक प्रभावीपणे चालणार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांऐवजी लोकनियुक्त प्रतिनिधींनाच जबाबदारी दिल्याने लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण झाले असून, गावांचा विकास अखंडितपणे सुरू राहणार असल्याचा विश्वास सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच सरपंचांच्या मागणीला पाठिंबा देणारे आ. श्रीकांत भारतीय,आ.सुरेश धस यांच्यासह राज्यातील ४० आमदारांचे सरपंच परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.

सरपंचांच्या न्याय्य मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारने लोकशाहीचा सन्मान राखला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. या ऐतिहासिक निर्णयाच्या स्वागतासाठी राज्यातील विविध भागांत सरपंच व पदाधिकाऱ्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून, मिठाई वाटप व अभिनंदन सोहळ्यांद्वारे सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.या निर्णयामुळे महाराष्ट्रातील ग्रामपंचायत व्यवस्थेला स्थैर्य मिळणार असून, ग्रामीण विकासाच्या कामांना नवे बळ मिळणार असल्याचे मत ग्रामपंचायत पदाधिकारी व सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सर्वांगीण विकास करावा–गटशिक्षणाधिकारी रवी कवडे

**अंबड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सर्वांगीण विकास करावा असे आवाहन अंबड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री रवी कवडे यांनी वडीगोद्री केंद्रांतर्गत शिक्षण परिषदेमध्ये (दि.२०) शिक्षकांना केले.यावेळी आयोजित कार्यक्रमात मंचावर पाथरवाला खुर्द येथील शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी उपाध्यक्ष आप्पासाहेब पाचुंदे,सुभाष बेहडे,सरपंच विठ्ठलराव सुडके,शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,केंद्रप्रमुख दत्ता भापकर,विषयतज्ञ अशोक पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यानंतर नविन पुनर्गठीत शालेय व्यवस्थापन समिती व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात केंद्रप्रमुख दत्ता भापकर यांनी वडीगोद्री केंद्रांतर्गत चाललेल्या उपक्रमांचा आढावा घेतला तसेच गुणवत्ता वाढीसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले.शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे यांनी निपुण चाचणी,व्ही.एस.के.प उपस्थिती,वार्षिक तपासणी,कॉपीमुक्त परीक्षा अभियान याबाबत मार्गदर्शन केले.गटशिक्षणाधिकारी रवी कवडे यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण देऊन सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहन करत शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पाथरवाला खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित शिक्षण परीषदेनंतर शाळेच्या कार्यालयाच्या नुतनीकरणाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी रवी कवडे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी शालेय परसबाग,शाळेत राबविलेले उपक्रम पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी पाथरवाला खुर्द येथील शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विलास हर्षे,पोलिस पाटील शेषराव राऊत,माजी पंचायत समिती सदस्य संजय ढवळे,ग्रामपंचायत सदस्य योगेश पाचुंदे,कल्याणराव सुडके, पांडुरंग सुडके,मेहेरनाथ हर्षे,श्रीमती रोहिणी घाडगे,शामसुंदर खरात,राहुल ढवळे,माजी सैनिक रमेश ढवळे, मुख्याध्यापक भिमराव ढाकणे,वडीगोद्री केंद्रांतर्गत मुख्याध्यापक व शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक अजेय बांगर,अविनाश तांदळे यांच्यासह विद्यार्थी,शिक्षक, ग्रामस्थ,पालक यांनी परीश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बालासाहेब मदनुरे तर आभार प्रदर्शन श्रीधर कुलकर्णी यांनी केले.

पान ६ वरुन...

### रत्नेश्वर मंदिरातील महाशिवरात्रीच्या

वाघमोडेची महापंगतीचे आयोजन

मादळमोही दि, २२ ( प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, त्यांची सांगता ह, भ, प, मंहत बालाजी महाराज शेंडगे, मठाधिपती श्रीराम यांच्या काल्याच्या किर्तनाचे रविवारी रोजी झाली, महा पंगतीचे आयोजन अन्नदाते परमेश्वर वाघमोडे यांनी केले या सप्ताहास रत्नेश्वर तरुण मंडळाचे विशेष सहाकार्य लाभले, मा, आ, अमरसिंह पंडीत यांनी काही काळातच सभा मंडपासाठी निधी देणार असल्याचे घोषीत केल्याने भाविक भक्त व गांवकार्यात आंनद व्यक्त केला केला, महाप्रसादाचा लाभ भाविक भक्ताने घेतला,

गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, या सप्ताहात नामावंत किर्तनकार व प्रवचनकार यांचे किर्तन व प्रवचननाचे आयोजन करण्यात आले होतेचंकलंबा येथिल रत्नेश्वर मंदिरातील महाशिवरात्रीच्या पार्वणी निमत्त हरिनाम सप्ताहाची सांगता

परमेश्वर वाघमोडेची महापंगतीचे आयोजन

मादळमोही दि, २२ ( प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, त्यांची सांगता ह, भ, प, मंहत बालाजी महाराज शेंडगे, मठाधिपती श्रीराम यांच्या काल्याच्या किर्तनाचे रविवारी रोजी झाली, महा पंगतीचे आयोजन अन्नदाते परमेश्वर वाघमोडे यांनी केले या सप्ताहास रत्नेश्वर तरुण मंडळाचे विशेष सहाकार्य लाभले, मा, आ, अमरसिंह पंडीत यांनी काही काळातच सभा मंडपासाठी निधी देणार असल्याचे घोषीत केल्याने भाविक भक्त व गांवकार्यात आंनद व्यक्त केला केला, महाप्रसादाचा लाभ भाविक भक्ताने घेतला,

गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, या सप्ताहात नामावंत किर्तनकार व प्रवचनकार यांचे किर्तन व प्रवचननाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी काल्याचे किर्तन ह, भ, प, मंहत बालाजी महाराज शेंडगे यांच्या अमततुल्य कीर्तनाने सांगता करण्यात आली, यावेळी उपस्थित सुघोस मुंडे सर विजय घाडगे माजी जिल्हा परिषद सदस्य युवराज जाधव सरपंच महादेव कारंडे उपसरपंच बंगाली पिंपळा मोहन टकले विलास वाघमोडे सरपंच अंबादास सांगळे सरपंच बाला नाईक तांडा युवा नेते अशोक गुंजाळ व रत्नेश्वर कमिटीतील सर्व तरुण मंडळी यावेळी उपस्थित

मा, आ, अमरसिंह पंडिताचा सभामंडप देण्याचे आश्वासन

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस मा, आ, अमरसिंह पंडित यांनी लवकरच रत्नेश्वर मंदिराचे सभामंडप करण्याचे आश्वासन दिले, या आश्वासना नंतर उपस्थिनांने टाळ्याच्या गाजरात संमती दिली, त्यामुळे चंकलंबा गटातील मतदारांत समाधान व्यक्त केले,

परमेश्वर वाघमोडे यांच्याकडून महा पंगतीचे अन्नदान

या भागातील वारकरी संप्रदायाचे पाईक ह, भ, प, परमेश्वर वाघमोडे यांनी महा अन्नदान पंगतीच्या महाप्रसादाचे आयोजन केले होते, यासाठी रत्नेश्वर तरुण मंडळाने महा दिंडी काढुन भक्तीमय वातावरण निर्माण केले,

### तुकोबांच्या भक्तिरंगात

राणा महाराज वासकर यांचे राहील. दि. ०२ मार्च रोजी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे (आळंदी) यांचे कीर्तन व ह.भ.प. योगी निरंजन नाथजी महाराज (विश्वस्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी) यांचे प्रवचन होईल. दि. ०३ मार्च रोजी ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारींगे (मुंबई) तर दि. ०४ मार्च रोजी ह.भ.प. अच्युत महाराज दस्तापूरकर यांचे कीर्तन होईल. व दि. ५ मार्च रोजी महंत श्री महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होईल.त्या नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री नामदेवराव इंदरराव गोरे, सुभद्रा इंडस्ट्रीज ग्रुप पुणे व समस्त गोरे परिवार यांच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम विश्वस्त मंडळ, प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम, औरंगपूर यांच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून दि. ०५ मार्च २०२६ रोजी संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त परिसरातील गावातून दिंड्या येऊन सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी या नामसप्ताहात सहभागी होऊन कीर्तन-भजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### शिवजन्मोत्सव रक्तदान

मल्टीस्टेट मुख्य कार्यकारी अधिकारी विलास पारेकर, खोलेश्वर मल्टीस्टेट मधील सर्व कर्मचारी आदी शिवभक्तांनी या रक्तदान शिबीरात अथक परिश्रम घेतले. शाळेच्या परिसरात केलेल्या गडकिल्ल्यांच्या देखाव्यामुळे परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. दिंद्रुड येथील अशोक फरताडे यांनी हि माझी ६५ वी रक्तदान करण्याची वेळ असल्याचे सांगितले.

महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

खोलेश्वर परिवाराच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला १५ महिलांनी रक्तदान केले.

## दैदिप्यमान नेत्रदिपक असा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा

### सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात २२ जोडपी विवाहबद्ध

माजलगाव । प्रतिनिधी

शिवजयंती निमित्ताने बाळू ताकट यांच्या संकल्पनेतून साजऱ्या होणाऱ्या महोत्सवात सामाजिक बांधिलकी जपत गेल्या चौदा वर्षापासून सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला जातो.केवळ विवाह सोहळा आयोजित करतच नाहीत तर मनी मंगळसूत्रापासून इतर मोठ्या वस्तू या नवविवाहित दाम्पत्यांस दिल्या जातात.दि १९ फेब्रुवारी गुरुवार रोजी सायंकाळी पार पडलेल्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात सर्वधर्मीय २२ जोडपे विवाह बद्ध झाले.



ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलींच्या वडिलांना कायम चिंता सतावत राहते की आपल्या मुलीच्या लग्नाचे आव्हान समोर असते.अशा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलींच्या लग्नाची जबाबदारी घेत सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करत या मुलींचे दायित्व बाळू ताकट स्वीकारत असतो.चौदा वर्षात ५७३ बहिणींचा संसार उभा करत बाळू ताकट यांनी समाजासमोर आणि आजच्या तरुणाई समोर आदर्श उभा केला आहे याचा लोकप्रतिनिधी या नात्याने कायमच अभिमान वाटतो असे आ.प्रकाश सोळंके यांनी बोलताना सांगितले.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार पुढे घेऊन जाणारा हा सोहळा भविष्य काळात असाच बहरत राहो अशा सदिच्छा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे संयोजक बाळु ताकट यांना बोलताना दिल्या.

## माजलगावच्या ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटची प्लेसमेंटमध्ये दमदार कामगिरी

**५४ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरीची संधी**



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्लेसमेंट क्षेत्रात लक्षणीय यश मिळवत अंतिम वर्षातील ५४ विद्यार्थ्यांची ढ-ढ- -ीींलो त्रिींळेप त्रीशशप एपशीसू डेश्रींळेपी झीीं. डींव. या आघाडीच्या कंपनीमध्ये निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा दर्जा अधोरेखित झाला आहे.

संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या पुढाकाराने कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला. वैयक्तिक मुलाखतींच्या टप्प्यांतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार आणि कोषाध्यक्ष डॉ. सुशील भैय्या लोढा यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले. उद्योगाभिमुख शिक्षण, प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षण आणि अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य प्रतिक वेळापुरे आणि टीपीओ ऋतुजा वेळापुरे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, संस्थेत राबविण्यात येणारे सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, औद्योगिक भेटी आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम यांचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला आहे.इलेक्ट्रिक वाहन (एत) बॅटरी व हरित ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपनीत काम करण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची पायरी ठरणार आहे. या यशामुळे ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने प्लेसमेंट क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

## श्री सिद्धेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी स्व.आशा भावसार पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभ , 'संगणकांचे अंतरंग' व 'चित्रमंजिरी' अंक प्रकाशन**

**माजलगाव । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ वी जयंती येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत भानप (माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष), प्रमुख अतिथी जेष्ठ पत्रकार कमलेश जाब्रस, प्रमुख वक्ते श्रीमती आशालता करपुडे, तर व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख अमोल ठाकुर, सहसंमेलन प्रमुख रामकृष्ण फुलझळके इत्यादी उपस्थित होते.



या कार्यक्रमाची सुरुवात शिबिर गीत, छत्रपती शिवाजी महाराज व पंचपरिवर्तन यांचे पूजन करुन झाले. यानंतर कला विभागाच्या वतीने दिला जाणारा स्व. आशा भावसार पुरस्कार चि. सर्वेश संदीप गिल्डा व कु. मधुरा संभाजी राऊत या विद्यार्थ्यांना देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच प्रतिवर्षी साकार होणारा 'संगणकांचे अंतरंग' व 'चित्रमंजिरी' अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मातृ मंदिर विश्वस्त संस्था निगडी पुणे आयोजित समुह गीत गायन स्पर्धेत व पोवाडा गायन स्पर्धेत प्राप्त झालेल्या बक्षीसाचे वितरण करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथी कमलेश जाब्रस यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला तसेच विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलनानिमीत्त आयोजित स्पर्धेत बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख वक्त्या श्रीमती आशालता करपुडे यांनी हिंदवी स्वराज्याची पार्श्वभूमी, इतिहास तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची नेतृत्व याविषयी सविस्तर माहिती दिली. यानंतर विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रशांत भानप यांनी केले, प्रास्ताविक श्रीमती रोहिणी वाघीले यांनी केले. बक्षीसाचे वाचन रोहित खिंडरे व श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी केले.आभार श्रीमती सारिका मुंडे व सुत्रसंचलन वरिष्ठ लिपिक श्रीकांत भुसारे यांनी केले.या कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली.शांती मंत्र मंगेश मुळी यांनी सांगितला. शिबिर गीत चैतन्य आहेर व संगीत विभागाच्या चमुने सादर केले.यावेळी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर,परमेश्वर आदमाने सर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंजनवती येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी !



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात अत्यंत जागृत,संघटित व क्रियाशील गाव अशी अंजनवतीची ओळख आहे आज दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी प्रतिवर्षाप्रमाणे ग्रामस्थांतर्फे सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते गेली अनेक वर्षांपासून सर्वच महापुरुषांची जयंती गावकरी एकत्रित येऊन साजरी करतात त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात अंजनवतीकरांनी आपला वेगळा ठसा उमटविण्याचे काम केले आहे सदरील कार्यक्रमाचे आयोजन शिवशक्ती-भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले होते गेले अनेक वर्षांपासून गावकऱ्यांच्या सतत मिळणाऱ्या भक्कम पाठिंब्यामुळे सदरील महोत्सवाचे हे २३ वे वर्षं असून डीजे मुक्त तसेच पारंपारिक वाद्य वाजवत जयंती सोहळा साजरा करून अंजनवतीकरांनी परिसरात आदर्श निर्माण केला आहे या जयंती सोहळ्याला गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती !!

जय शिवराय ! जय भीम !!

# अवकाळी पावसाच्या शक्यतेने शेतकरी धास्तावले

पुणे : राज्याच्या काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता काही हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केल्याची माहिती समाज माध्यमांवर प्रसारित होत आहे. तसेच २३ ते २५ फेब्रुवारीदरम्यान काही भागात गारपीट होण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतु शेतकऱ्यांनी अधिकृत हवामान अंदाजावर लक्ष ठेवण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे

सध्या रब्बी हंगामातील हरभरा, गहू आणि ज्वारी ही पिके काढणीच्या टप्प्यावर आहेत. अनेक ठिकाणी हरभऱ्याची काढणी सुरू असून, काही भागात गव्हाची व ज्वारीचीही कापणी वेगाने सुरू आहे. अशा परिस्थितीत अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त होत असल्याने उभ्या पिकांसह काढणी केलेल्या शेतीमालाचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल जाणवत असून ढगाळ वातावरण, वाढलेली आर्द्रता आणि तापमानातील चढ-उतार यामुळे पावसाच्या शक्यतेला बळ मिळत असल्याचे बोलले जात



आहे. विशेषत: गारपीट झाल्यास हरभऱ्याचे घाटे झडणे, गव्हाचे दाणे ओलाव्यामुळे काळे पडणे तसेच ज्वारीच्या कणसांचे नुकसान होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. काही शेतकऱ्यांनी काढणी केलेला माल शेतातच साठवून ठेवला असून, अवकाळी पावसामुळे तो भिजण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाने तातडीने काढणीचे काम पूर्ण करून शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवण्याची धावपळ सुरू केली आहे. दरम्यान, कृषी विभागाकडून अधिकृत हवामान अंदाजावर लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीच्या आधारे निर्णय घ्यावेत, असे सांगण्यात आले आहे.

**रब्बी पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता** : शेतकऱ्यांनी काढणी केलेला माल झाकून ठेवणे, पिकांची तातडीने कापणी पूर्ण करणे आणि आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, असा सल्ला देण्यात आला आहे. अवकाळी पावसाचा अंदाज खरा ठरल्यास जिल्ह्यातील रब्बी पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती तयारी ठेवावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

## वराहपालनासाठी मिळते लाखोंचे अनुदान; अर्ज करण्याची पद्धत!

या अनेक तरुण मुले उच्च शिक्षण घेत, आपल्या ज्ञानाचा वापर शेती किंवा शेतीसंबंधित व्यवसायामध्ये करत आहेत. त्यामुळे आता जर तुम्हालाही एखाद्या व्यवसायात उतरायचे असेल. तर वराहपालन व्यवसाय तुमच्यासाठी योग्य असणार आहे. वराहपालनातून मांस विक्रीतून मोठी कमाई तर होतेच, याशिवाय डुकराचे मांस आणि त्याच्या कातडीपासून वेगवगेळ्या वस्तू बनवल्या जातात. वराहपालन व्यवसायासाठी भांडवल कसे उभे करायचे? सरकार किती अनुदान देते? याबाबत सविस्तरपणे जाणून घेतल्यास याचा चांगला फायदा होतो.

या गोष्टींसाठी मिळते कर्ज : शेतकऱ्यांना एका छत्राखाली मांस, बकरीचे दूध, लोकर, अंडी उत्पादन वाढविणे, वैरणीची उपलब्धता वाढविणे, प्रती पशुधन उत्पादन क्षमतेत वाढ करणे, पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे, नाविण्यपुर्ण उपक्रमांस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी पशुपालन फार महत्त्वाचे आहे. वराह, बकरी आणि मेंढीपालन यांच्या माध्यमातून शेतकरी अधिक चांगले उत्पन्न मिळवू शकतात. राज्य आणि केंद्र सरकार विविध योजनांमधून पशूसंवर्धनासाठी अनुदान देत आहे. त्यामुळे तुम्ही राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत वराहपालनासाठी अनुदान मिळवू शकतात.

हा आहे योजनेचा उद्देश : राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत २०१४-१५ पासून राबविण्यात येत आहे. सन २०२१-२२ पासून राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास या कार्यक्रमाची सुधारित पुनर्रचना करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित योजनेचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, पशुची उत्पादकता वाढवणे आहे, असे उद्देश आहेत.

वराहपालनासाठी एवढे मिळते अनुदान : ५० मादी आणि ५ नरांसाठी १५ लाख रुपये. १०० मादी आणि १० नरांसाठी ३० लाख रुपये.

अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे : मागील ३ वर्षांचे आयकर विवरण. मागील ६ महिन्यांचे बँक स्टेटमेंट. मुख्य प्रवर्तकाचे पॅन/आधार कार्ड. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) प्रशिक्षण प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, स्कॅन केलेला फोटो.



## फुलोऱ्यात हरभरा वाळत असल्यास अशी करा उपाययोजना

हरभरा हे रब्बी हंगामातील महत्त्वाचे पीक असून अनेक शेतकऱ्यांचे उत्पन्न त्यावर अवलंबून असते. मात्र या पिकावर येणाऱ्या विविध रोगांपैकी मर रोग हा अतिशय घातक रोग मानला जातो. हा रोग मुख्यत: फ्युजारिअम ऑक्सिस्पोरम या मातीजन्य बुरशीमुळे होतो. विशेषत: कोरडवाहू भागात या रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून येतो. जर रोपावस्थेतच मर रोगाचा प्रादुर्भाव झाला, तर संपूर्ण पीक नष्ट होण्याची शक्यता असते. फुलोरा किंवा घाटे भरण्याच्या काळात रोग आल्यास दाणे नीट भरत नाहीत आणि उत्पादनाची गुणवत्ता व प्रमाण दोन्ही घटते. काही वेळा या रोगामुळे १० टक्क्यांपासून ते थेट १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

मर रोगाची सुरुवात : मर रोगाची सुरुवात साधारणपणे रोपावस्थेत किंवा फुलोऱ्याच्या काळात होते. सुरुवातीला झाडाच्या खालच्या पानांचा रंग पिवळसर होतो. हळूहळू संपूर्ण झाड वाळायला लागते आणि वाढ खुंटते. काही वेळा झाडाचा अर्धा भाग वाळलेला दिसतो, यालाच आंशिक मर असे म्हणतात. मुळाजवळील खोड कापून पाहिले असता आतल्या वाहिन्या तपकिरी किंवा काळपट झालेल्या दिसतात. रोगाची तीव्रता वाढल्यास संपूर्ण झाड कोमेजून मरते, मात्र पाने झडून पडत नाहीत.हा रोग मुख्यत: रोगग्रस्त पिकांचे अवशेष, माती आणि संक्रमित बियाण्यांद्वारे पसरतो. ही बुरशी जमिनीत अनेक वर्षे जिवंत राहू शकते. प्रतिकूल परिस्थितीत ती विशेष बीजाणू तयार करून टिकून राहते आणि अनुकूल



वातावरण मिळताच पुन्हा सक्रिय होते. बुरशी मुळांद्वारे झाडात प्रवेश करून पाणी व अन्नद्रव्य वाहून नेणाऱ्या नलिकांमध्ये वाढते. त्यामुळे झाडाला पाणी व अन्नद्रव्यांचा पुरवठा बंद होतो आणि झाड वाळते.

या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची कारणे आणि नियंत्रण : सलग अनेक वर्षे हरभरा लागवड करणे, निचरा नसलेली जड जमीन, २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान, संक्रमित बियाण्यांचा वापर, जमिनीत सेंद्रिय कर्बाचे कमी प्रमाण आणि पाणी-अन्नद्रव्यांचा ताण या कारणांमुळे मर रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. हवामान बदलामुळे वाढते तापमान, अनियमित पाऊस आणि दुष्काळी परिस्थिती यामुळेही या रोगाची तीव्रता अलीकडे वाढताना दिसत आहे.

हरभरा मर रोग हा मातीजन्य आणि झाडाच्या आत वाढणारा रोग असल्यामुळे केवळ फवारणीद्वारे रासायनिक नियंत्रण प्रभावी ठरत नाही. त्यामुळे एकात्मिक रोग व्यवस्थापन हाच यावर योग्य उपाय आहे. रोगग्रस्त व अर्धवट वाळलेली झाडे मुळासकट उपटून शेताबाहेर नष्ट करावीत. शेतात पाणी साचू देऊ नये आणि गरजेनुसारच हलके पाणी द्यावे. ट्रायकोडर्मा व्हिरिडी किंवा ट्रायकोडर्मा हार्झियानम हे जैवघटक २.५ ते ५ किलो प्रति हेक्टर शेणखतात मिसळून ओळींमध्ये द्यावेत. ओळींमध्ये २५० ते ५०० किलो नीमकेक प्रति हेक्टर वापर केल्यास चांगला फायदा होतो. शेणखत व सेंद्रिय खतांचा वापर वाढवून जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संतुलन राखावे. चांगला निचरा असलेली जमीन निवडावी आणि नत्र खताचा अतिरेक टाळावा. हरभऱ्यानंतर पुढील हंगामात ज्वारी, बाजरी किंवा मका यांसारखी पिके घेऊन पीक फेरपालट करावी. पुढील हंगामासाठी फुले विक्रांत, विजय, विशाल, दिग्विजय, जे.जी.-११ यांसारखे प्रतिरोधक वाण आणि प्रमाणित, रोगमुक्त बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यांना ट्रायकोडर्मा ४ ते ५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे प्रक्रिया केल्यास मर रोगाचा धोका निश्चितच कमी करता येतो.

## पामची शेती करा आणि मिळवा भरघोस नफा

शेतकरी मित्रानो खाद्यतेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. अशात भारत सरकार देखील खाद्यतेलाच्या देशातील निर्मितीसाठी प्रोत्साहन देते आहे. पाम चे झाड आता एक फायदेशीर व्यवसाय बनला आहे. पामची शेती एक फायदेशीर व्यवसायात बदलली आहे, परंतु कोणत्याही व्यवसायाप्रमाणे, यासाठी देखील संयम, योग्य व्यवस्थापन, देखरेख आणि मजबूत मनोबल आवश्यक आहे. पाम तेलाचे उत्पादन हे नायजेरिया, भारत, इक्काडोर, ग्वाटेमाला, पापुआ न्यू गिनी, कोलंबिया आणि थायलंडमध्ये अतिशय लोकप्रिय व्यवसाय म्हणून उदयास आला आहे.

पाम ट्री वैशिष्ट्ये : सर्व बारमाही महिने उत्पादन देणाऱ्या पिकांमध्ये पाम तेल पीक हे सर्वाधिक तेल देणारे पीक आहे. पाम वृक्ष खाण्यायोग्य पाम तेल तसेच पाम कर्नल तेल तयार करतो. त्याच्या उच्च उत्पादन क्षमतेमुळे, हे पाम तेल गोल्डन पाम मानले जाते. भारतात, १५ पेक्षा जास्त राज्यांमध्ये सुमारे ५०,००० हेक्टर क्षेत्रात पाम तेलाच्या झाडांची लागवड केली जाते आणि या पिकाची लागवड पावसावर अवलंबून असते.

पाणी आणि हवामान : पाम तेल हे आर्द्र उष्णकटिबंधीय क्षेत्रात वाढणारे पीक आहे. जेथे तापमान २२ ते २४ आणि २० ते ३३ दरम्यान असते तिथे त्याची चांगली वाढ होते.

पाम तेलाच्या चांगल्या वाढीसाठी किमान ५ ते ६ तासांचा चांगला सूर्यप्रकाश आणि दररोज ८०% आर्द्रता आवश्यक असते. या पिकाला दर महिन्याला २५०० ते ४००० मिमी किंवा १५० मिमी पावसाची आवश्यकता असते.

जमीन : सामान्यत: पामची झाडे विविध प्रकारच्या मातीत उगवता येते, परंतु ते सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेल्या चांगल्या निचऱ्याच्या खोल माती आणि गाळयुक्त जमिनीत ते चांगले



वाढते. या झाडांना किमान १ मीटर मातीची खोली आवश्यक आहे. त्याच्या लागवडीसाठी, शेतकऱ्यांनी जास्त क्षारयुक्त, जास्त क्षारयुक्त, किनारपट्टीवरील वालुकामय आणि पाणी साचणारी जमीन टाळावी.

भारतातील पाम तेलाच्या जाती : टेनेरा - ही पातळ कवच असलेली पामची एक अतिशय सामान्य जात आहे आणि जगभरात त्याची लागवड केली जाते. ड्युरा - या जातीची व्यावसायिकरित्या लागवड केली जात नाही आणि शेलची जाडी २ ते ८ मिमी असते. पिसिफेरा - हा एक प्रकार आहे जो शंखरहित फळ देतो.

पाम तेल शेती : पाम ची शेती ही मुख्यत्वे बियाण्याद्वारे घेतली जाते. बियाणे जास्त सुप्त असल्यामुळे त्यांना ४० डिग्री सेल्सिअस तापमानात ७५ दिवस आधी गरम करणे आवश्यक आहे. यानंतर बिया वाहत्या पाण्यात भिजवून ४-५ दिवस थंड होण्यासाठी ठेवाव्यात. बियाणे १० ते १२ दिवसात उगवतात आणि उगवण झाल्यानंतर पेरणी करावी.

पुर्व मशागत, अंतर आणि लागवड : पामच्या लागवडीसाठी जमीन तणमुक्त करावी आणि जमीन चांगली भुसभुशीत होण्यासाठी दोन नांगरणी करावी. पाम तेल प्रत्यारोपणासाठी सर्वोत्तम हंगाम जून ते डिसेंबर असतो. त्रिकोणी लागवड पद्धतीनुसार ९ मीटर ९ मीटर ९ मीटर अंतर ठेवून लागवड करावी. तसेच १ हेक्टर जागेत १४३ ते १४५ ताडाची झाडे लावता येतात. ६० सेमी ६० सेमी ६० सेमी आकाराच्या खड्ड्यात लागवड करावी.

कीड आणि रोग : पाम शेतीमध्ये आढळणाऱ्या सामान्य कीटक आणि रोगांमध्ये पेस्टेलोटाइप्सिस लीफ स्पॉट, गॅनोडर्मा बट रॉट, बॅक्टेरियल बड रॉट, ऑइल पाम विल्ट, गेंडा बीटल आणि मेली बग यांचा समावेश होतो. या कीड व रोगांवर जवळच्या कृषी विभागाशी संपर्क साधून योग्य त्या नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात.

काढणी : ताडाचे झाड शेतात लावल्यानंतर ५ ते ६ वर्षात काढणीस तयार होते.

ताड की खेतीमध्ये कापणीची वेळ निश्चित करणे फार महत्वाचे आहे, कारण ते तेलाच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर खूप परिणाम करते. फळे पिवळ्या-केशरी रंगाची होतात आणि ५ ते ८ फळे स्वत:च गळतात तेव्हा काढणी करता येते. याशिवाय फळाला बोटाने जोराने दाबल्यास पाम फळांमधून केशरी रंगाचे तेल निघते, तर समजावे की ते काढणीसाठी तयार आहे. कापणी वर्षभर चालते आणि साधारणपणे १० ते १४ दिवसांच्या अंतराने तीक्ष्ण चाकू किंवा विळ्याने केली जाते.

पाम लागवडीचे फायदे : इतर तेल पिकांच्या तुलनेत सर्वाधिक खाद्यतेल पाम तेलापासून मिळते. पाम तेल पीक हे कडक पीक आहे आणि कीड आणि रोगांना कमी धोका आहे. पामतेलाच्या पूर्वधारणेच्या कालावधीत शेतकऱ्यांना आंतरपीकातून अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. चोरीचा धोका नाही आणि स्थानिक रोजगार प्रदान करतो. हे पीक वर्षभर मासिक उत्पन्न आणि चांगला बाजारभाव देतो. शेतकरी जास्त उत्पन्नाची अपेक्षा करू शकतात ज्यामुळे आर्थिक स्थिती सुधारते.

भारतात पाम शेती : भारतातील प्रमुख पाम तेल उत्पादक राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, कर्नाटक, आसाम, केरळ, गुजरात, गोवा, तामिळनाडू, महाराष्ट्र, त्रिपुरा, पश्चिम बंगाल आणि अंदमान यांचा समावेश होतो.




### महत्वाच्या घटना

१४५५: पाश्चिमात्य देशातील पहिले छापील पुस्तक 'गटेनबर्ग बायबल' प्रकाशित झाले.
१७३९: चिमाजी अप्पाच्या वसई मोहिमेत मानाजी आंग्रे यांनी रेवदंड्यावर हल्ला चढवला.
१८८७: रिव्हेरा येथे या दिवशी भुकंप
१९०५: आजच्या दिवशी रोटरी इंटरनेशनल क्लब ची स्थापना.
१९४१: डॉ. ग्लेन सीबोर्ग यांनी प्लूटोनिअम हे मूलद्रव्य प्रथमच वेगळे केले.
१९४५: दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्सच्या विमानांनी जर्मनीतील फोर्झेम शहर बेचिराख केले.
१९४५: दुसरे महायुद्ध - पोलंडच्या पोझ्नान शहरात जर्मन सैन्याने शरणागती पत्करली.
१९४५: दुसरे महायुद्ध - अमेरिकन सैन्याने फिलिपाईन्सची राजधानी मनिला
१९४५: दुसरे महायुद्ध - इवो जिमाची लढाई अमेरिकन नौदलाचे काही सैनिक (मरीन्स) प्रशांत महासागरातील माउंट सुराबाचीवर पोचले व त्यांनी तेथे अमेरिकन झेंडा उभारला. हे करीत असतानाचे त्यांचे छायाचित्र जगप्रसिद्ध झाले.
१९४७: आंतरराष्ट्रीय मानक संस्थेची स्थापना
१९५२: संसदेने कामगार भविष्य निर्वाह निधी विधेयक मंजूर केले.
१९६६: सीरियात लष्करी उठाव झाला.
१९७०: आजच्या दिवशी दक्षिण अमेरिकेतील एक देश गुयाना देशात प्रजेची सत्ता आली.
१९९६: कोकण रेल्वेच्या चिपळूण खेड टप्प्यातील वाहतूकीचा शुभारंभ
१९९७: रशियाच्या 'मीर' या अंतराळस्थानकामधे आग लागली.
२०००: संस्कृत पंडित रा. ना. दांडेकर आणि काश्मिरी कवी रेहमान राही यांना साहित्य अकादमी ची फेलोशिप जाहीर
२००३: ग्रॅमी पुरस्कार चे वितरण करण्यात आले. नोरा जोन्स आणि जॉन मेयर यांना पुरस्काराने सन्मानित.
२००७: आजच्या दिवशी पाकिस्तान च्या शाहीन-२ चे चाचणी केल्या गेली.
२०१०: आजच्या दिवशी एम.एफ.हुसैन यांना भारताची नागरिकता प्रधान केल्या गेली.
२०१२: मेरीलँड मध्ये समलैंगिक विवाहाची अनुमती देणारा कायदा मंजूर झाला.
२०१४: ला रशिया च्या सोच्ची या शहरात हिवाळी ऑलिम्पिक चा समारोप करण्यात आला.
२०१६: डोनाल्ड ट्रंप यांनी नेवादा रिपब्लिकन ची प्राथमिक निवडणूक ४५.९.५% ने जिंकली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४: जगप्रसिध्द नाटककार शेक्सपिअरचा जन्म
१६३३: सॅम्युअल पेपिस - विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक (मृत्यू: २६ मे १७०३)
१८५०: रिट्झ हॉटेल, लंडन आणि रिट्झ हॉटेल, पॅरिस चे निर्माते सीझर रिट्झ यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९१४ )
१८७६: देबुजी झिंगराजी जानोरकर ऊर्फ 'संत गाडगे महाराज' - कमालीचे अज्ञान, अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष सेवेचे व्रत घेतले आणि त्यासाठी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. (मृत्यू: २० डिसेंबर १९५६)
१९१३: प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार - जादूगार (मृत्यू: ६ जानेवारी १९७१)
१९५४: आध्यात्मिक गुरु बाबा हरदेव सिंह यांचा जन्म.
१९६५: हेलेना सुकोव्हा - झेकोस्लोव्हाकियाची टेनिस खेळाडू
१९६५: अशोक कामटे - मुंबईच्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलिस कमिशनर (मृत्यू: २६ नोव्हेंबर२००८)
१९६८: भारतीय चित्रपट अभिनेत्री कृतिका देसाई खान यांचा जन्म.
१९५७: येरेन नायडू - तेलगु देसम पक्षाचे लोकसभेतील नेते (मृत्यू: २ नोव्हेंबर २०१२)
१९८३: भारतीय अमेरिकन कास्य कलाकार अजीज अंसारी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७७: कार्ल फ्रेड्रिक गाऊस - जर्मन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ, आर्किमिडीज व न्यूटन यांच्या तोडीचे गणितज्ञ, इलिप्टीक फंक्शन्स व नॉन युक्लिडियन जॉमेट्री इ. विषयांवर त्यांचा मोठा अभ्यास होता. (जन्म: ३० एप्रिल १७७७)
१७९२: सर जोशुआ रेनॉल्ड्स - ब्रिटिश चित्रकार व रॉयल अ‍ॅकॅडमीचे पहिले अध्यक्ष, व्यक्तिचित्रे काढण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. (जन्म: १६ जुलै १७२३ प्लिम्प्टन, प्लायमाऊथ, इंग्लंड)
१९०४: महेन्द्र लाल सरकार - होमिओपॅथ, समाजसुधारक व विज्ञानप्रसारक, 'इंडियन असोसिएशन ऑफ कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेचे सहसंस्थापक, होमिओपाथीच्या प्रसारासाठी त्यांनी १८६८ मधे 'जर्नल ऑफ मेडिसीन' हे मासिक सुरू केले. (जन्म: २ नोव्हेंबर १८३३ पैकपारा, हावडा, पश्चिम बंगाल)
१९४४: लिओ हेन्ड्रिक आर्थर बेकेलँड - अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ, १९०९ मधे त्यांनी लाखेवर अनेक प्रयोग करुन 'बॅकेलाईट' नावाचा पदार्थ तयार केला. ही प्लॅस्टिक युगाची सुरुवात मानली जाते. (जन्म:१४ नोव्हेंबर १८६३ घेन्ट, बेल्जिअम)
१९६९: मुमताज जहाँ बेगम देहलवी ऊर्फ मधुबाला - चित्रपट अभिनेत्री (जन्म: १४ फेब्रुवारी १९३३ नवी दिल्ली)
१९६९: प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार वृंदावनलाल वर्मा यांचे निधन.
१९७५: ओडीसा चे माजी मुख्यमंत्री राजेंद्र नारायण सिंह देव यांचे निधन.
१९९८: रमण लांबा - क्रिकेटपटू (जन्म: २ जानेवारी १९६०)
१९९०: पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध भारतीय लेखक अमृतलाल नागर यांचे निधन.
२०००: वासुदेवशास्त्री धुंडिराज तांबे - वेदशास्त्राचे गाढे अभ्यासक
२००४: विजय आनंद - हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: २२ जानेवारी १९३४)
२००४: सिकंदर बख्त - केन्द्रीय परराष्ट्रमंत्री, केरळचे राज्यपाल व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते (जन्म: २४ ऑगस्ट १९१८)
२०११: सहज योग च्या संस्थापिका आणि अध्यात्म गुरु निर्मला श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ३० एप्रिल १९२३).

# १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्याचा हिस्सा किती?

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कोकणातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. या योजनेला नाव मराठवाड्यातील असले तरी सध्या बहुतांश प्रकल्प नाशिक भागातील होत आहेत. १६८ टीएमसी पाण्याचे नियोजन करणे सुरु आहे, या पाण्यातून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, असा रोकडा सवाल श्रृंगऋषीगड येथे आयोजित संवाद बैठकीत उपस्थित शेतकर्यांनी लोकप्रतिनिधींना केला. या बैठकीस बप्पासाहेब तळेकर, राजसाहेब पवळ, भाऊसाहेब जरांगे पाटिल, शिवप्रसाद खेडकर, रामराव खेडकर, ह.भ.प.सुरेश महाराज कोळेकर,धुराजी बाबा कोळेकर, राज पाटील, अशोकराव निपटे, तुकाराम तळतकर, परमेश्वर वाघमोडे, गावडे मामा, गणेश कोळेकर, महादेव कारांडे, सुधीर माने,भारत सोळुंके, गोपाल आहेर, भाऊसाहेब महानोर, सरपंच नंदकुमार शिंदे, दीपक जाधव आदींसह शेतकरी उपस्थित होते.

सिंदफणा पट्ट्यासह बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरण अथवा पाटाचे पाणी मिळत नाही. त्यातच बीड जिल्ह्यात दर तीन चार वर्षांने दुष्काळ पडतो. त्यामुळे फळबाग, ऊस, भाजीपाला उत्पादकसह इतर शेतकर्‍यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या शेतकर्‍यांना जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासाठी तीनशेपेक्षा अधिक गावांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाची महत्वाची वार्षिक बैठक शिरूर तालुक्यातील श्रृंगऋषीगड येथे आयोजित केली होती. या बैठकीत लोकलढा आंदोलनाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जलतज्ज्ञ व अनुभवी शेतकरी यांनी मार्गदर्शन केले. मराठवाड्यातील शेतीला पाणी मिळावे व या भागातील दुष्काळ दूर व्हावा यासाठी सरकार पश्चिमी वाहिनी नद्यांचे कोकणात जाणारे यातील १६८ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी विविध योजना राबवित आहे. ही योजना मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी असली तरी सध्या या योजनेतून नाशिक व इतर भागातच कामे सुरू आहेत, सरकारला जर बीड जिल्ह्यातील दुष्काळ दूर करायचा असेल तर बीड जिल्ह्यातील शेतीला नेमके किती पाणी मिळणार आहे हा आकडा सरकार व बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी सांगावा असा प्रश्न या बैठकीत शेतकर्‍यांनी उपस्थित केला. जायकवाडी धरणाचे पाणी नांदेड पर्यंत गेले, मात्र हे पाणी बीड जिल्ह्यातील ऐंशी टक्के शेतीला मिळत नाही, माजलगाव धरण व गेवराई तालुक्यातून जाणार्या कालव्याचे पाणीही सरकारने कमी केले, आता १६८ टीएमसी पाण्यापासूनही बीड जिल्हा वंचित राहिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या नशिबी ऊसतोड, तरुणांचे स्थलांतर व आत्महत्या कायम राहत्याल. त्यामुळे १६८ टीएमसी पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, सर्व बीड जिल्हा पाण्याखाली येईल का, यासाठी सरकार व लोकप्रतिनिधी यांनी काय केले, याची माहिती जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी शेतकर्यांना द्यावी, अशी मागणीही यावेळी शेतकर्यांनी केली. या बैठकीस शेतकर्‍यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## संवाद बैठकीत शेतकऱ्यांचा लोकप्रतिनिधींना प्रश्न



**शेतकरी करणार व्यापक आंदोलन :** जायकवाडी धरण झाले तेव्हा बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला हे पाणी मिळाले नाही, जायकवाडी धरणाचे आपल्याला जे पाणी मिळते त्यात २०१८ मध्ये कपात करण्यात आली. आताही कोकणच्या पाण्यात बीड जिल्ह्यातील शेतीला हिस्सा न मिळाल्यास शेतकर्यांच्या पिढ्यानपिढ्या बरबाद होतील. त. त्यामुळे बीड जिल्ह्यातील वंचित शेतीला पाणी मिळावे, यासाठी येत्या काळात व्यापक जनआंदोलन करण्याचा निर्धारही या बैठकीत शेतकऱ्यांनी केला.

## लोकप्रतिनिधींनी भूमिका मांडावी

२०४७ सालापर्येंत विकसित भारत करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाच्या वतीने शेती सिंचन वाढविणे, हेही एक धोरण आहे. याच धोरणाचा भाग म्हणून सिंचन योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनांतून बीड जिल्ह्यातील शेतीला किती पाणी मिळणार, यासाठी काय योजना करण्यात येणार आहे व किती टीएमसी पाणी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळेल यावर पालकमंत्री, खासदार व आमदार यांनी भूमिका मांडावी, अशी मागणीही या बैठकीत करण्यात आली आहे.

---

# पाथर्डीत बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन

## टोळीवर धडक कारवाई करण्याची मागणी

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज मुरूम उपसा सर्रास केला जात असून अवैध गौण खनिज माफिया राज आणि गुंडांचा हैदोस पाहायला मिळत आहे परंतु महसूल प्रशासनाच्या कारवाईची प्रतीक्षा असून अवैध गौण खनिज करणाऱ्यांवर मकोका कायद्यानुसार कारवाईची मागणी माहिती अधिकार महासंघाचे शैलेंद्र जायभाये यांनी केली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की पाथर्डी तालुक्यात मुंबई विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ काम सुरू असून सदरील कामासाठी मुंबई विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग ६१ बडेवाडी टोल प्लाझा शेजारी बडेवाडी गावच्या शिवारातील तलावातून अवैध मुरूम उत्खनन केले आहे आणि सदरील राष्ट्रीय महामार्गाच्या साईडपट्ट्या भरण्यासाठी अवैध मुरूम उपसा केला आहे याबाबत पाथर्डी तहसील कार्यालयात रॉयल्टी अत्यंत माफक भरली असून जुन्या एकदा भरलेल्या रॉयल्टीवर हजारो ब्रास मुरूम अवैध उत्खनन केले आहे तसेच वीट उत्पादण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात माती लागते यासाठी शिरसाटवाडी येथील तलाव बीड आणि अहिल्यानगर सरहद्दीवर असणाऱ्या घाटशीळ पारगाव मध्यम प्रकल्प तलावातील अवैध माती आणि मुरूम उत्खनन सर्रासपणे सुरू असून कुठलीही महसूल दप्तरी रॉयल्टी न भरता अवैध उत्खनन चालू आहे अवैध गौण खनिज अनधिकृत उत्खनन करणाऱ्या माफीयावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

पाथर्डी तालुक्यात अवैध मुरूम खनिज उत्खनन करणाऱ्यांचा महसुली एजंट विनोद सारखा पाठिराखा आहे का अशी चर्चा तालुक्यात रंगली आहे पाथर्डी तालुक्यात न दिसणारे गुंडाराज तयार झाले असून तोंड दाबून नाकावर बुक्क्याचा मार मिळत आहे वाढती गुन्हेगारी बेकायदेशीर उत्खनन चोरी दरोडे अन्य गंभीर गुन्हे घडतात सामान्य व्यक्तींना धमकावून खोटे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे सर्वसामान्य लोक दबक्या आवाजात बोलत असून रक्षक जर भक्षक होत असतील तर कायद्यावर विश्वास ठेवायचा का नाही असा प्रश्न फाटक्या तुटक्या वंचित पीडित घटकांना पडला आहे यामुळे पाथर्डी तालुक्याला विशेष पालकमंत्री नेमण्याची आवश्यकता आहे आणि हे पालकमंत्री पद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावे

– बाळासाहेब बटुळे (ऊसतोड कामगारांचे नेते)

पाथर्डी तालुक्यात अवैध मुरूम वाळू माती अशा नैसर्गिक संपत्तीचे बेकायदेशीर खनिज उत्खनन होत असल्याची तक्रार प्राप्त असून लवकरच महसुली पथक नेमून अवैध उत्खनन करणाऱ्या माफीयावर कारवाई करण्यात येईल

**– डॉ.उद्धव नाईक (तहसीलदार)**

---

# रोहित पवारांच्या जीवितास धोका, त्यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी

## जामखेड तालुक्यात पोलीस प्रशासनाला निवेदन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारीला विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली होती. दरम्यान, अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विविध शंका उपस्थित केल्या जात आहेत. विशेषत: या विमान अपघाताबाबत आमदार रोहित पवार यांनी काही खळबळजनक आरोप केले आहेत. याच पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांना झेड प्लस सुरक्षा द्यावी, अशी मागणी जामखेड तालुक्यातील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. खर्डा येथील पोलीस ठाण्यात पोलीस प्रशासनाला निवेदन देत ही मागणी केली आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूबाबत रोहित पवारांनी घातपाताची शक्यता व्यक्त केल्याने जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, यावेळी बोलताना रोहित पवारांनी दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत खळबळजनक दावा केला आहे.

सोबतच यावेळी व्हीआरएस कंपनीवर काही गंभीर आरोप करत भाजपच्या ट्रॉलर्सलाही खडेबोल सुनावले आहे दरम्यान, अकाउंटेबल, फ्लाईट सेफ्टी मॅनेजरची चौकशी झाली का? त्यांना अटक झाली का? या जबाबदार व्यक्ती आहेत. हि व्यक्ती मोठं प्रस्त आहे, म्हणून त्यांना वाचनावण्यात येतंय. यातील एका कंपनी अधिकाऱ्यांवर अत्याचाराचे आरोप आहेत. लायसन्स नसताना अनधिकृतपणे विमान चावण्यात येत होते. तर भाजपचे ट्रोल या पत्रकार परिषदेला ट्रोल करत आहेत. आम्हाला प्रश्न पडतो की भाजपच्या ट्रोलकडून इतका विरोध का? त्या ट्रोलला पैसे कोण देतंय? ते भाजपची बाजू मांडत असतात हे आम्हाला माहिती आहे. यांनी पूर्वी रोहित शेट्टींना ब्लॅकमेल केलं होतं. भाजपचे ट्रोल जर विरोध करतात तर मग या कटात भाजपही सहभागी आहे का? अशी शंका निर्माण होते. असेही रोहित पवार म्हणाले.

---

# मालेवाडी,पवळागड,वारे वस्ती रस्त्याची दुरावस्था



पाथर्डी प्रतिनिधी


मालेवाडी गावातील श्रीपतवाडी पुल ते पवळागड वारे वस्ती हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील तब्बल चार कोटी तीस लक्ष रुपये खर्च करून करण्यात आलेला रस्ता अत्यंत निकृष्ट झाल्याचा आरोप पवळागड येथील स्थानिक रहिवासी शेतकरी पप्पू दराडे यांनी केला आहे या कामाची गुणनियंत्रण कक्षाकडून तपासणी करून रस्त्याचे काम दर्जेदार करण्याची मागणी केली आहे तसेच सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टी झाल्याने मालेवाडी पवळागडावरील रस्ता निकृष्ट केल्याने पूर्णपणे वाहून गेला होता आता पुन्हा त्या रस्त्याचे काम सुरू केले असले तरी साईडपट्ट्या भरण्यासाठी मुरूम वापरणे आवश्यक असताना तेथे खरीप वापरले आहे यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ता पूर्णपणे डांबरीकरण करून वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी पवळागडावरील शेतकऱ्यांनी केली आहे.

---

# शॉटसर्किटमुळे दीड एकर ऊस जळून खाक

परभणी । प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यातील कंठेश्वर शेतशिवारात दि. २१ फेब्रुवारी रोजी विद्युत वहन तारांमध्ये अचानक शॉटसर्किट झाले. शेतात कृषी पंपासाठी महावितरण उपविभाग, पूर्णा ग्रामीण खात्याअंतर्गत विद्युत खांबावर बसवण्यात आलेल्या तारा मागील अनेक दिवसांपासून लोंबकळत होत्या.या विद्युत वहन चालू तारांमध्ये अचानक शॉटसर्किट घडून आले. तारांतील घर्षणातून ज्वालांची ठिणगी उडून फडात पडली आणि तोडणीच्या तयारीत असलेला दीड एकर ऊस आगीत भस्मसात झाला. या घटनेत कंठेश्वर शिवारातील शेतकरी उत्तम रावसाहेब कदम (गट क्रमांक १०८) यांचे सुमारे दोन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे मागील काही दिवसांपासून शॉटसर्किटच्या घटना सातत्याने घडत असून ग्रामीण



भागातील अनेक शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक झाला आहे. तरीदेखील महावितरणचे अभियंते गांभीर्याने दखल घेत नसून वाकलेले खांब, जुने, जीर्ण आणि लोंबकळलेले विद्युत तारे दुरुस्त करण्यात येत नाहीत. परिणामी, शॉटसर्किटच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उभे ऊस जळून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. संबंधित शेतकरी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना वाकलेले खांब, जीर्ण झालेले तसेच लोंबकळलेले विद्युत तारे नवीन करून दुरुस्त करावेत, यासाठी वारंवार निवेदने देत आहेत तसेच तोंडीही सूचना देत आहेत. मात्र त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. उलट विजबिल थकबाकीचे कारण सांगून अभियंते जबाबदारी झटकत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना कोणीही वाली राहिलेला नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कोणीही यावे आणि शेतकऱ्यांच्या कपाळी टिकली मारून जावे, अशी अवस्था झाल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

---

# भर हळदीत 'पिरतीच्या झुल्यात झुलवा' वर महिलेची भन्नाट लावणी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

सध्या लग्नसराईचे दिवस सुरू असून सोशल मीडियावर लग्नातील हटके रील्स, व्हिडीओ आणि फोटो सतत व्हायरल होत असतात. या व्हायरल होणाऱ्या व्हिडीओंमध्ये लग्नातील अनेक गमतीजमती, अनोख्या प्रथा, हटके उखाणे आपल्याला पाहायला मिळतात. सध्या असाच एका हळदीतील सुंदर व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यात एक महिला अतिशय सुंदर डान्स करताना दिसतेय.

समाजमाध्यमांवर विविध विषयांवर आधारित व्हिडीओ व्हायरल होत असतात. ज्यात कधी समारंभाचे व्हिडीओ, लग्नाचे व्हिडीओ तर कधी नृत्याचे व्हिडीओ पाहायला मिळतात. परंतु यातील काही मोजकेच व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेत येतात. आता असाच एक व्हिडीओ खूप चर्चेत आलाय. ज्यात एक महिला खूप लावणी करताना दिसतेय. लावणी नृत्य ही महाराष्ट्राची लोककला आहे. गावाच्या जत्रेतून पिढ्यापिढ्या मनोरंजन करणारी लावणी आजही लोकांच्या पंसतीस उतरते.

लावणी ही वाटते तितके सोपे नाही. लावणी करण्यासाठी नृत्याची जाण तर लागतेच त्याचबरोबर नृत्य करण्यासाठी अदाही लागते. ढोलकीच्या तालावर आणि घुंगराच्या बोलावर एकापेक्षा एक लावणी सादर करणाऱ्या कलाकारांचे अनेक व्हिडिओ रोज सोशल मीडियावर व्हायरल होत असतात पण मोजकेच व्हिडिओ असतात जे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतात. आताही असाच एक सुंदर व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

---

# मटका व पत्त्यांचे जुगार अड्डे पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने सुरू

परतुर । प्रतिनिधी

परतूर शहरासह ग्रामीण भागात परतुर पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने मटका आणि पत्त्याचे जुगार अड्डे जोरात सुरू असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. मटका पत्त्याचा जुगार अड्डा बंद करण्यासाठी परतुर पोलिसांना सूचना करावे असे मागणी होत आहे. तालुक्यातील वरफळ व सातोना गावांमध्ये अवैध मटका जुगार पुन्हा उघडपणे सुरू झाल्याने महिलांचे संसार उद्ध्वस्त होत . स्थानिक हॉटेल्समध्ये आणि गल्लीबोळात छोटे केबिन तयार करून खुलेआम मटका घेतला जात जुगार खेळणाऱ्यांना चिठ्ठ्या लिहून दिल्या जात आहेत. ही परिस्थिती पाहता पोलिस प्रशासनाचे मौन अधिकच संशयास्पद वाटत आहे. खुलेआम मटका –पोलिसांना माहिती असूनही सुद्धा कारवाई केल्या जात नाही. वरफळ गावातील एका हॉटेलमध्ये मटका खेळण्यासाठी वेगळे केबिन तयार करून रोज



सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्यवहार सुरू असतात. खेळाडूंना आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या देऊन पैसे घेतले जातात, तर काही ठिकाणी मोबाईलद्वारे सट्ट्याची देवाणघेवाणही होत असल्याची माहिती मिळाली आहे. दररोज काही ठराविक वेळी मटका सुरू होतो. सगळ्यांच्या नजरेसमोर हा धंदा सुरू असूनही पोलीस दुर्लक्ष करतात. यामुळे नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित केला जात आहे की, पोलीसांना माहिती असूनही कारवाई का होत नाही?

मटका किंग यांना कोणाचा वरदहस्त आहे का? काही काळ नियंत्रण, आता पुन्हा धंदे तेजीत परतूर येथे काही महिन्यांपूर्वी पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध मटका, जुगार आणि सट्टेबाजीवर प्रमाणात मोहीम राबवून अनेक ठिकाणी कारवाई केली होती. त्या काळात परतूर तालुक्यातीत मटका व्यवसाय जवळपास बंद झाला होता. मात्र आता परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाली आहे. मटका बहाद्दरांनी पुन्हा निर्धास्तपणे धंदा सुरू केला आहे. आता पोलिसांची नजर चुकवून किंवा काही ठिकाणी गुटखा माफिया यांच्या अवैध गुटखा विक्रीमुळे युवा पिढीचे आरोग्य धोक्यात आले आहेत. प्रतिबंधीत गुटखा सर्रास विकला जातो. त्यातच आता ग्रामीण भागात मटका नावाचा जुगार मोठ्या प्रमाणात खेळविला जात आहे. आणि यातही युवा पिढी मोठ्या प्रमाणात गुरफटली जात आहे. हा सर्व प्रकार केवळ पोलीसांच्या आर्थिक हितसंबंधांमुळे जपला जात आहे. याकडे पोलीस अधिक्षकांनी आता गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होती आहे. पैशांच्या देवाणघेवाणीतून हा व्यवसाय फोफावला आहे. असे स्थानिक ग्रामस्थांनी बोलल्या जात आहे. फक्त वरफळच नव्हे तर सातोना, वाटूर आणिपूर्ण परतूर मध्ये गाव भागात आणि मोंढा परिसरातही हा अवैध मटका व्यवसाय जोमात असल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी मटका केंद्रांना सध्याच्या आर्थिक अडचर्णीच्या काळात अनेक गोरगरीब नागरिक 'दहा रुपयांत हजार जिंकण्याचे आमिष' दाखवून मटक्याच्या जाळ्यात अडकले आहेत. लोकांच्या लोभाचा फायदा घेत काही जुगारबाज पैसे गोळा करून पळून जातात, तर काही ठिकाणी सतत हरल्याने लोक आर्थिकदृष्ट्या उद्ध?वस्त होत आहेत, असे एका नागरिकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पोलीस प्रशासनाला आवाहन केले आहे की, मटका नावाचा जुगार पूर्णपणे बंद करून गरीब जनतेला दिलासा द्यावा. ग्रामीण भागातही विस्तार 'स्थायी ठिकाणे' मिळाली असून, या ठिकाणी दिवसभर गर्दी पाहायला मिळते. पोलीस ठाण्याकडून मात्र कोणतीही अधिकृत कारवाई झाल्याचे वृत्त नाही. यामुळे नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे की, पूर्वीसारखी कठोर कारवाई न झाल्यास हा अवैध व्यवसाय पूर्ण तालुक्यात पसरू शकतो. अवैध धंद्यावर कायम स्वरूपी बंदी हवी स्थानिक नागरिकांनी पुढील मागण्या केल्या आहेतः वरफळ व सातोना परिसरातील सर्व संशयित ठिकाणी तातडीने छापेमारी करावी. मटका खेळणारे, चालवणारे आणि संरक्षण देणारे यांच्यावर गुन्हे नोंदवावेत. अवैध जुगार थांबवण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करावी. जुगारमुक्तीबाबत सार्वजनिक जनजागृती मोहीम राबवावी. परतूर तालुक्यातील या परिस्थितीने कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी केवळ मोहीम म्हणून नव्हे, तर सातत्यपूर्ण व निष्पक्ष कारवाई करून 'मटका माफिया'चा सुळसुळाट कायमचा थांबवावा. अवैध जुगाराचे पैसे पुढे गुन्हेगारीकडे वळतात, हे लक्षात घेता प्रशासनाने जनहितासाठी तात्काळ पावले उचलणे गरजेचे आहे.

# पाटोदा शहरात हॉटेल्समध्ये अस्वच्छतेचा कहर

## चिमुरड्यांच्या आरोग्याशी खेळ, अन्न व औषध प्रशासन झोपलेय का?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात सध्या खाद्यप्रेमींच्या आरोग्याशी जीवघेणा खेळ सुरू असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. शहरातील विविध हॉटेल्स आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

### अस्वच्छतेचे 'विष' आणि मुलांचे आरोग्य धोक्यात

**शहरातील अनेक हॉटेल्समध्ये डोकावून पाहिल्यास स्वयंपाकघरातील दुर्गंधी, उघड्यावर ठेवलेले अन्न आणि काळवंडलेल्या तेलाचा पुन्हा पुन्हा होणारा वापर स्पष्टपणे दिसून येत आहे. वडापाव, पुरी-भाजी यांसारखे पदार्थ आवडीने खाणारी शालेय मुले या अस्वच्छतेच्या विळख्यात सापडली आहेत. यामुळे पोटाचे विकार, विषबाधा आणि इतर गंभीर आजार जडण्याची भीती पालकांकडून व्यक्त केली जात आहे.**

नियमांची पायमल्ली; परवान्यांचा पत्ताच नाही!

अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यानुसार (FSSAI), प्रत्येक हॉटेल व्यावसायिकाकडे वैध परवाना असणे आणि स्वच्छतेचे निकष पाळणे बंधनकारक आहे. मात्र, पाटोद्यात नियम फक्त कागदावरच असल्याचे दिसते.

परवाना अभाव: अनेक हॉटेलचालकांकडे FSSAI Registration नाही.

आरोग्य तपासणी शून्य: कामगारांचे मेडिकल सर्टिफिकेट आणि अन्नाची गुणवत्ता तपासण्याची तसदीही कोणी घेत नाही.

प्रशासकीय सुस्ती: अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने हॉटेलचालकांचे फावले आहे.

आता तरी FDA जागी होणार का?

आत्तापर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे हॉटेलचालक निर्ढावले आहेत. लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या व्यावसायिकांवर प्रशासन कधी कारवाई करणार? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. FDA विभागाने तातडीने शहरात धाडी टाकून, अस्वच्छ हॉटेल्सवर दंडात्मक कारवाई करावी आणि विनापरवाना व्यवसाय बंद पाडावेत, अशी मागणी आता पालक वर्ग जोर धरू लागली आहे.

# परिक्षा केंद्र परिसरात तरूणांच्या दोन गटात हाणामाऱ्या
# आष्टी तालुक्यातील दौलावडगांव येथील घटना!

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील परिक्षा केंद्र परिसरात गर्दी केलेल्या दोन गटात किरकोळ कारणावरून शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता.पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने हा वाद निवाळला.हा प्रकार दौलावडगाव येथे दुपारी एकच्या दरम्यान घडला.याप्रकरणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून पोलीस काय कारवाई करणार हे पाहणे औचित्याचे आहे.

आष्टी तालुक्यातील दौलावडगांव येथील सरस्वती परिक्षा केंद्रावर गुरूवारी मराठी विषयाचा पेपर सुरू असताना परिक्षार्थी परिक्षा देत होते.तर पोलीस व होमगार्ड कर्तव्यावर असताना परिक्षा केंद्राच्या कंपाऊंडवर शब्दिक चकमक सुरू झाली.तिथून थोड्या अंतरावर येताच तरूणांच्या दोन गटात तुबळ हानामारीची घटना घडली.पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर हा वाद निवाळला.परिक्षा केंद्र परिसरात ठरवून दिलेल्या अंतरावर कोणालाही प्रवेश नसताना वावर करणार्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश असताना याकडे दुर्लक्ष होत असल्याने हा प्रकार घडला आहे.सुदैवाने मोठा अनर्थ घडला नाही.पण काही काळ मात्र याठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसुन आले.

पोलीस कारवाई करणार का?

परिक्षा केंद्राच्या बाहेर विनाकारण गर्दी करून नियमाचे उल्लंघन करत दोन गटात शब्दिक चकमक होऊन हाणामारीच्या घटना घडल्याचे व्हिडीओ समोर येत असताना हा वाद निवाळला असला तरी याप्रकरणी पोलीस कारवाई करणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# चौसाळा येथे हनुमान व गणपतीच्या मूर्तींची स्थापना

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथे गेल्या अनेक वर्षापासून जुन्या विजीर्ण झालेल्या देवाच्या मूर्तीची नव्याने रूपांतर करून नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे तसेच कीर्तनाचे आयोजन करून मूर्तीची स्थापना करण्यात आली



चौसाळा येथील नागरिकाच्या व भाविक भक्ताच्या वतीने शासनाची मदत न घेता व कोणत्याही नागरिकाला मागणी न करता व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून स्वयंपूर्ण लोकांनी लोक वर्गणी करून गावातील हनुमान मंदिर यांच्यासह दोन्ही मंदिराच्या शिखर व कळस नव्याने करून दोन्ही मूर्तीची वैदिक मंत्रांनी स्थापना करून व मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले यावेळी बहुसंख्याने महिला मंडळांनी भाग घेतला व कलाशासाठी कन्या मंडळ यांनी २ लाख ५१ हजार रुपये जमा करून कलशासाठी आर्थिक दान केले तसेच स्वयंपूर्ण अन्नदानासाठी सुद्धा नागरिकांनी आपापला वाटा उचलला बांधकामासाठी १५ लाखाच्या आसपास आर्थिक दान देण्यात आले या सतत ३ दिवस चाललेल्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाला कीर्तन भजन हरिपाठ शोभायात्रा व मिरवणूक यासारख्या कार्यक्रमाची रेलचेल होती यावर्षी हनुमान महादेव मंदिर बांधकाम समितीच्या वतीने झालेल्या पूर्ण लोक वर्गणी चे तसेच खर्चाचा हिशोब देऊन डिजिटल बोर्डवर माहिती दिली या पारदर्शक कार्याची नागरिकातून पंच कमिटी चे समाधान व्यक्त केले आहे

# राज्यस्तरीय शिवचरित्र सामान्यज्ञान स्पर्धेत अंजली साळवेने द्वितीय क्रमांक पटकावला

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालय, इतिहास विभाग व सुंदररत्न करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८/०२/२०२६ रोजी राज्यस्तरीय शिवचरित्र सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिवचरित्रावर आधारित प्रश्नांमधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कसोटी पाहण्यात आली.

या स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवत कु. अंजली बालासाहेब साळवे हिने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे संस्थेचे व पालकांचे नाव उज्ज्वल झाले आहे. कु. अंजली साळवे हिचे सर्वत्र मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून तिच्या पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# जिल्ह्यातील व बाहेरील कारखानदारांकडून ऊस बिले रखडली : भाई गंगाभिषण थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचा ऊस गाळप केल्यापासून १४ दिवसांच्या आत उसाची रक्कम अदा करणे बंधनकारक आहे. शुगर केन ॲक्टनुसार हा स्पष्ट नियम असतानाही यंदाच्या हंगामात अनेक कारखान्यांकडून शेतकऱ्यांच्या उसाची बिले दोन ते तीन महिने प्रलंबित ठेवण्यात आल्याचे शेतकरी नेते भाई गंगाभिषेक ठाकरे यांनी म्हटले आहे. यामुळे आधीच आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांची कोंडी अधिकच वाढली आहे.**



शेतकरी नेते भाई गंगा भीषण थावरे म्हणाले की, उस गाळप झाल्यानंतर १४ दिवसांत पैसे देणे हा कायद्याचा नियम आहे. हा नियम कारखानदारांकडून पाळला गेला पाहिजे. शेतकऱ्यांना दोन-दोन महिने वाट पाहायला लावणे अन्यायकारक आहे. गेल्या काही महिन्यांपासून शेतीमालाला हमीभाव, वाढते खत-बियाण्यांचे दर आणि अवकाळी पावसाचे संकट अशा विविध अडचणींना शेतकरी सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत उसाचे पैसे वेळेवर न मिळाल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह, कर्जफेड आणि पुढील हंगामाची तयारी या सर्व बाबींवर परिणाम होत आहे. पुढील हंगामात शेतकऱ्यांनी १४ दिवसांत बिल देण्याची लेखी हमी कारखान्यांकडून घ्यावी आणि त्यानंतरच ऊस गाळपासाठी द्यावा. कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाची थकित रक्कम तात्काळ अदा करावी अशी मागणी थावरे यांनी केली आहे.

# रत्नेश्वर मंदिरातील महाशिवरात्रीच्या पर्वणीनिमत्त हरिनाम सप्ताहाची सांगता

माद‌ळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, त्यांची सांगता ह, भ, प, मंहत बालाजी महाराज शेंडगे, मठाधिपती श्रीराम यांच्या काल्याच्या किर्तनाचे रविवारी रोजी झाली, महा पंगतीचे आयोजन अन्नदाते परमेश्वर वाघमोडे यांनी केले या सप्ताहास रत्नेश्वर तरुण मंडळाचे विशेष सहाकार्य लाभले, मा, आ, अमरसिंह पंडीत यांनी काही काळातच सभा मंडपासाठी निधी देणार असल्याचे घोषीत केल्याने भाविक भक्त व गांवकार्यात आंनद व्यक्त केला केला, महाप्रसादाचा लाभ भाविक भक्ताने घेतला,

गेवराई तालुक्यातील चंकलंबा येथिल ग्राम दैवत रत्नेश्वर मंदिरात महाशिवरात्री नित्तम अंखड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते, या सप्ताहात नामावंत किर्तनकार व प्रवचनकार यांचे किर्तन व प्रवचननाचे आयोजन करण्यात आले होते ,यावेळी रथरात्रीचे संपुर्ण गावातुन महिला, भाविक भक्ताने भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते यानंतर काल्याचे किर्तन ह, भ, प, मंहत बालाजी महाराज शेंडगे यांचे झाले, या सांगतासचंकलंबा येथिल रत्नेश्वर मंदिरातील महाशिवरात्रीच्या पार्वणी निमत्त हरिनाम सप्ताहाची सांगता

परमेश्वर



# तुकोबांच्या भक्तिरंगात पावनधाम न्हाऊन निघणार!

## अखंड हरिनाम सप्ताह ,श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथापारायन सोहळ्याची भक्तिमय पर्वणी

**केज । प्रतिनिधी**

जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त औरंगपूर येथे प्रति देहू श्रीक्षेत्र पावनधाम येथे अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व भव्य गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा आठ दिवसीय भक्तिमय सोहळा दि. २६ फेब्रुवारी २०२६ (गुरुवार) रोजी प्रारंभ होऊन दि. ०५ मार्च २०२६ (गुरुवार) रोजी सांगता होणार आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, नामस्मरण आणि अध्यात्मिक वातावरणाची निर्मिती होणार आहे.



सप्ताहाच्या दरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते १२ गाथा पारायण, दुपारी २ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ कीर्तन, संगीत भजन व हरिजागर असा दैनंदिन कार्यक्रम राहणार आहे. या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे. दि. २६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. एकनाथ महाराज हांडे (पंढरपूर), दि. २७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. डॉ रामकृष्ण महाराज लहवितकर (नाशिक), दि. २८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा), दि. ०१ मार्च रोजी ह.भ.प. श्रीगुरु पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन होणार असून प्रवचन ह.भ.प. देवव्रत (पान २ वर)

# अरणविहरा येथे शिवजयंती उत्साहात साजरी सरपंच शिरसाठ यांच्याकडून गाव जेवण

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अरणविरहीरा या गावात शिवजयंती निमित्त ह भ प पवार महाराज याच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले.



रयतेचे राजे श्रीमंत योगी छत्रपती शिवाजीमहाराज याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत मोठ्या उत्हाही वातावरणात शिवजयंती साजरी करून आख्खा गावाला सरपंच आण्णासाहेब शिरसाठ यांनी गाव जेवण दिले.

आष्टी तालुक्यातील अरणविहरा गावात छत्रपती शिवाजीमहाराज याची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजीमहाराज याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी केली. त्यानंतर हभप पवार महाराज यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. किर्तना नंतर गावचे सरपंच आण्णासाहेब शिरसाठ यानी गाव जेवण दिले. या प्रसंगी नियोजनासाठी श्रीषीकेश जाधव, उपसरपंच रोहिदास चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य आजिनाथ शिरसाठ, याच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची रेल्वे स्थानकाला औद्योगिक भेट; रेल्वेमार्ग रचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण

बीड । प्रतिनिधी

अभियांत्रिकी शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कार्यपद्धतीशी जोडले गेले पाहिजे, या उद्देशातून आदित्य पॉलिटेक्निक, बीड येथील प्रथम व द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांची भारतीय रेल्वे, बीड येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण, रेल्वे अभियांत्रिकीची प्रत्यक्ष माहिती आत्मसात केली.



आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या अधिपत्याखाली ही भेट पार पडली. रेल्वे स्टेशन, बीड येथे विद्यार्थ्यांनी ट्रॅक लेआउट, पुलांची रचना, देखभाल पद्धती आणि सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा प्रत्यक्ष अभ्यास केला.

या वेळी स्टेशन मास्टर अतुल मराठे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय रेल्वेची प्रशासकीय व तांत्रिक कार्यपद्धती समजावून सांगितली. रेल्वे मार्गांची रचना, सिग्नल व नियंत्रण प्रणाली, ट्रॅक देखभाल, तसेच अपघात टाळण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या खबरदाऱ्या याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी क्षेत्रात जबाबदारीची जाणीव आणि नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, यावरही त्यांनी विशेष भर दिला.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व व्यवस्थापन समजले. तांत्रिक दृष्टिकोन, निर्णयक्षमता, व्यावसायिक शिस्त आणि संघभावना यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही वाढला.

या भेटीत स्थापत्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. वरपे, प्रा. अजय दुधाळ, प्रा. गोंठे यांच्यासह ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. भेटीचे नियोजन प्रा. प्रशांत दुधाळ व प्रा. अजय दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ही भेट ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.



# नवगण राजुरीच्या गजानन विद्यालयात शिवजयंती साजरी

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती साजरी करण्यात आली. गुरुवार दि१९फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य प्रशांत पवळ यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर त्यांनी शिवजयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस. पर्यवेक्षक दगडे व्ही. एन, शेख एस. वाय, भोसले बी. एस, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, उपस्थित होते.

# रक्तदान करत शिवजन्मोत्सव साजरा

## दिंद्रुडच्या खोलेश्वर परिवाराचा आदर्श उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

रक्ताचा तुटवडा भरून निघण्यासाठी खारीचा वाटा उचलत सलग सहाव्या वर्षीही शिवजन्मोत्सवाचा सण रक्तदान करून साजरा करण्याचा संकल्प दिंद्रुड येथील खोलेश्वर परिवाराने पूर्ण केला. गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३९६ व्या शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबीराचे उद्घाटन मराठा सेवा संघ प्रदेश संघटक पुरुषोत्तम जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, व उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी,प्रमुख पाहुणे योगेश शेजुळ, नारायण झोडगे, विलास कोळपे, मुख्यकार्यकारी अधिकारी विलास पारेकर सह दिंद्रुड पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक या प्रसंगी उपस्थित होते. शिबिरात २४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ओमप्रकाश जी शेटे यांची या रक्तदान शिबीरास सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची मुर्ती देऊन सत्कार करण्यात आले.

खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पारेकर यांच्या संकल्पनेतून गेल्या सहा वर्षांपासून शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन १९ फेब्रुवारीला करण्यात येते. परळी येथील वैद्यनाथ रक्त पेडी चे तंत्रज्ञ बिबीशन सांगळे,भाविका गाथे यांनी २४५ तरुण-तरुणींचे रक्तदान करवून घेतले. दिंद्रुड व पंचक्रोशीतील शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची मुर्ती व सहभाग प्रमाणपत्र यावेळी देण्यात आले. खोलेश्वर परिवारातर्फे रक्तदात्यांना चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली होती. खोलेश्वर ◀◀ पान ३ वर

# एकाच कुटुंबावर दोन आघात; कांबळे कुटुंबाला अशोक डकचा आधार

## मुलाचे अपघाती निधन तर वडिलांना हृदयविकाराचा झटका

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील ब्रह्मगांव येथील ऊसतोड मजूर बाळु रामभाऊ कांबळे याचे कर्नाटक राज्यातील मुदुळ जिल्ह्यात दि.१४ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाले . वडील रामभाऊ कांबळे यांना या अपघाती निधनाचा मोठा धक्का बसला कमी वयात मुलाचे झालेले अपघाती निधन त्या वडिलांच्या जिव्हारी लागले. सतत आपल्या मुलाच्या आठवणी त्या ( वडिल रामभाऊ कांबळे ) यांना भेडसावत होत्या. तारुण्यात आलेला मुलगा अचानक जाण्याने त्या वडिलांवर ( कुटुंबावर ) दुःखाचा डोंगर कोसळला होता. वडिलांनी मुलाच्या निधनाचा धसका घेतला होता.



मुलगा गेला या दुःखात रामभाऊ सतत रडत होता.. त्या दुःखात त्याने स्वतःची काळजी घेतली नाही कुटुंबाला झालेल्या डोंगराएवढ्या दुःखातून तो स्वतःला सावरू शकला नाही आणि त्यालाही मुलाच्या जाण्यामुळे हृदय विकासाचा झटका आला आणि त्याचीही प्राणज्योत दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मावळली.. एकापाठोपाठ एक आघात या कांबळे कुटुंबावर झाले. यांची माहिती कळताच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी कांबळे कुटुंबाची सांत्वन पर भेट घेतली व मी कांबळे कुटुंबाच्या सोबत आहे आसा धीर दिला. मुदुळ येथील ज्या कारखान्याला मुलगा गेला होता त्या संबंधित कारखान्याकडून काही आर्थिक मदत मिळते का ? या साठीही प्रयत्न करतो असा शब्द दिला. व कुटुंबाला स्वतः तर्फे काही आर्थिक मदत करण्याचा शब्द दिला. या सांत्वन पर भेटीवेळी त्याच्या सोबत मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, काँग्रेस सोशल मीडिया समन्वयक, जिल्हाध्यक्ष तथा मा.विभागाचे उपाध्यक्ष सुधाकर कांबळेसह, युवा नेते रमेश जाधव, अंजन कांबळे, नितीन कांबळे, मनोज गायकवाड, अरुण कांबळे,प्रशांत कांबळे, संतोष कांबळे, अनिल कांबळे, संग्राम कांबळे, नवनाथ लोखंडे, गणेश कांबळे, दादा कांबळे, समाधान कांबळेसह असंख्य गावकरी मंडळी व महिला उपस्थित होत्या.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मुठा नदी प्रदूषणमुक्तीसाठी महापालिकेचा 'ट्रॅश बॅरिअर' निर्णय

पुणे । प्रतिनिधी

शहराची जीवनरेखा असलेल्या मुठा नदीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी पुणे महानगरपालिका आता ठोस आणि तांत्रिक पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. नदीत तरंगणारा प्लास्टिक कचरा, प्लास्टिक बाटल्या, थर्माकोल आणि अन्य प्लास्टिक साहित्य अडविण्यासाठी नदीपात्रात 'ट्रॅश बॅरिअर' बसविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

बाबा भिडे पुलाजवळ एका खाजगी संस्थेने राबविलेल्या प्रयोगाला मिळालेल्या यशानंतर शहरातून वाहणाऱ्या सुमारे ४४ किलोमीटरच्या मुठा नदीपात्रात विविध ठिकाणी असे बॅरिअर उभारण्याची योजना आखली जात आहे. यासाठी आगामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या उपायुक्त किशोरी शिंदे यांनी दिली. मुठा नदीत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा, चप्पल, शालेय पिशव्या, प्लास्टिक बाटल्या तसेच विविध घरगुती टाकाऊ वस्तू फेकल्या जात आहेत. धार्मिक श्रद्धेच्या नावाखाली पूजासाहित्य, देवतांच्या मूर्ती आणि नारळ थेट नदीत



विसर्जित केले जातात. हा सर्व कचरा पाण्याच्या प्रवाहासोबत पुढे सरकत संपूर्ण नदी प्रदूषित करीत आहे. परिणामी नदीचे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या पर्यावरणाबाबतच्या सकारात्मक भूमिकेमुळे या उपक्रमासाठी आवश्यक निधीची तरतूद होईल, अशी पर्यावरणप्रेमींना अपेक्षा आहे. नदीतील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'वर्शिप अर्थ फाउंडेशन'ने बाबा भिडे पुलाजवळ 'ट्रॅश बॅरिअर' बसविले. या उपक्रमामुळे चार महिन्यांत जमा होणारा कचरा आता अवघ्या एका आठवड्यात गोळा होत असल्याचे समोर आले आहे. दर आठवड्याला तीन ते चार मोठे डंपर ट्रक कचरा नदीतून बाहेर काढला जात असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक पराग मते यांनी दिली. महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून नदी प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. ट्रॅश बॅरिअरच्या यशस्वी प्रयोगानंतर आता संपूर्ण नदीपात्रात १० ते १२ ठिकाणी असे बॅरिअर उभारण्याची गरज व्यक्त केली जात आहे. ट्रॅश बॅरिअर म्हणजे नदीच्या पृष्ठभागावर बसविलेले तरंगते कुंपण. हे कुंपण नदीच्या प्रवाहात अशा प्रकारे बसविले जाते की पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित राहतो. मात्र, पृष्ठभागावर तरंगणारा प्लास्टिक, थर्माकोल, काचेच्या बाटल्या आणि इतर कचरा त्यात अडकतो. या बॅरिअरमध्ये साठलेला कचरा मशिन किंवा स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने सहज गोळा करता येतो आणि त्याची योग्य विल्हेवाट लावता येते. विशेष म्हणजे, पाण्यात सुमारे सहा फूट खोलीपर्यंत वाहणारा कचराही या प्रणालीद्वारे अडवता येतो.

मुठा नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी भिडे पुलाजवळ बसविलेल्या ट्रॅश बॅरिअरमुळे अपेक्षेपेक्षा अधिक कचरा जमा होत आहे. दर आठवड्याला तीन ते चार डंपर कचरा बाहेर काढला जातो. संपूर्ण नदी प्रदूषित होण्यापासून वाचविण्यासाठी पुणे शहरात किमान १० ते १२ ठिकाणी असे बॅरिअर बसविणे आवश्यक आहे.

# शरद पवारांचा रिपोर्ट नॉर्मल, ब्लड टेस्ट अन् सिटीस्कॅन केला

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची प्रकृती रविवारी काहीशी बिघडली. त्यांना अशक्तपणा जाणवत असल्यामुळे पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी काहीशी कमी झाली आहे. त्यामुळे शरद पवार यांना थकवा जाणवत असल्याचे सांगण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांना श्वसनाचा त्रास जाणवत असल्याने बारामतीवरुन पुण्याला आणण्यात आले होते. पाच दिवसांच्या उपचारानंतर शरद पवार यांना १५ फेब्रुवारीला घरी सोडण्यात आले होते. मात्र, आज त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.



रुबी रुग्णालयात शरद पवार यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉ. परवेझ ग्रँट यांनी प्रसारमाध्यमांना पवारांच्या प्रकृतीबाबत माहिती दिली. त्यांनी म्हटले की, शरद पवार यांना दोन दिवसांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना काही त्रास झाल्यामुळे उपचार सुरू करण्यात आले आहेत. पुढील दोन दिवस शरद पवार रुबी हॉल क्लिनिकमध्ये उपचार घेतील, अशी माहिती रुग्णालयाकडून देण्यात आली. शरद पवारांची रक्ताची चाचणी करण्यात आली आहेत. तसेच त्यांचा सिटीस्कॅन देखील करण्यात आलेला आहे. या दोन्ही चाचण्यांचे अहवाल साधारण आल्याचेही डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

दरम्यान, शरद पवार यांच्या निकटवर्तीयांपैकी एक असणारे विठ्ठल मणियार यांनी रुबी रुग्णालयात जाऊन शरद पवार यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, शरद पवार यांची प्रकृती सध्या चांगली आहे. त्यांना रुटीन चेकअपसाठी रुबी रुग्णालयात आणण्यात आले आहे. गेल्या आठवडाभर ते थोडे अस्वस्थ होते. त्यानंतर नियमित तपासणी व विविध वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. संध्याकाळनंतर डॉक्टर त्यांच्या अहवालांच्या आधारे पुढील निर्णय घेतील. त्यांना किती दिवस ॲडमिट ठेवायचे किंवा नाही, हे तेव्हा ठरवले जाईल. डॉक्टरांनीच त्यांना तपासणीसाठी बोलावले होते, त्यामुळे ते येथे आले आहेत. शरद पवार पूर्णपणे फिट आहेत आणि त्यांना कोणतीही गंभीर समस्या नाही, असे डॉक्टर विठ्ठल मणियार यांनी सांगितले.

# अजितदादांच्या अपघाताची सखोल तपासणी करण्याच्या मागणीसाठी लोणी भापकरमध्ये कडकडीत बंद

बारामती । प्रतिनिधी

दिवंगत नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत दिवसेंदिवस संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. अपघात की घातपात याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून राज्य सरकारने या अपघाताची सखोल चौकशी करावी आणि सत्य बाहेर आणावे या मागणीसाठी बारामती तालुक्यातील लोणी भापकर गाव आज बंद ठेवण्यात आले आहे. यावेळी ग्रामस्थांनी 'अमर रहे, अमर रहे अजितदादा अमर रहे' अशा घोषणाही दिल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांचा अपघात झाला नसून त्यांचा घातपात केल्याचा संशय आहे. अजित पवारांचा




अपघाताचा तपास व्हावा या मागणीसाठी बारामती तालुक्यातील लोणी भापकर हे गाव आज बंद ठेवण्यात आले आहे.यासंदर्भात लोणी भापकर ग्रामपंचायतीने पोलीस निरीक्षकांना पत्र लिहले आहे. अजितदादांच्या निधनाबाबत प्रसारमाध्यमांमध्ये सुरु असणाऱ्या बातम्या पाहता आम्हाला अजित पवार यांचा घातपात झाल्याचा संशय आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, यासाठी आम्ही निवेदन देणार आहोत. तसेच आमच्या गावातील सर्व संघटना व ग्रामस्थ आजच्या बंदमध्ये सामील होणार आहेत, असे पत्र लोणीभापकर ग्रामपंचायतीने पोलिसांना दिले आहे. दुसरीकडे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत घातपाताचा संशय व्यक्त केला होता. रोहित पवार यांनी अलीकडेच दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन यासंदर्भात सविस्तर मांडणी केली होती. यावेळी त्यांनी व्हीएसआर विमान कंपनी आणि पायलट सुमित कपूर यांच्याबाबत संशय व्यक्त केला होता. सोबतच यावेळी रोहित पवारांनी तेलगू देशम पक्ष पक्षावर काही आरोप केले होते. हे आरोप आता तेलगू देशम पक्षाकडून फेटाळून लावण्यात आले आहेत. रोहित पवारांच्या आरोपांना ऑन रेकॉर्ड उत्तर देण्यास मात्र तेलगू देसम पक्षाच्या नेत्यांचा नकार असल्याची माहिती आहे.

# वाघोलीत अवजड वाहतूक कारवाईचा अनागोंदी कारभार उघड

पुणे । प्रतिनिधी

वाघोली येथे अवजड वाहतूक कारवाईमध्ये वाहतूक कर्मचाऱ्यांकडून होत असलेला अनागोंदी कारभार सहायक पोलीस निरीक्षक राहुल कोळंबीकर यांच्या समोर २१ फेब्रुवारी रोजी नागरिकांनी स्वतः हजर राहून पुराव्यानीशी उघड केला आहे.

वाघोली व लोणीकंद येथील दोन युवकांच्या अवजड वाहतूक वाहनावर वाघोली वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक राहुल कोळंबीकर यांच्या आदेशाने वजन करून त्याचा अहवाल प्रादेशिक परिवहन विभागाकडे ११ फेब्रुवारी रोजी सादर करून वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली.

या कारवाईत वाघोली वाहतूक शाखेच्या समोरील जागेत जवळपास ९ दिवस वाहने उभी होती. सदर दोन वाहनांची कारवाई प्रक्रिया १८ फेब्रुवारी रोजी पूर्ण झाली. दोन्ही वाहनांचा दंड लाखमोलाचा ठरला आहे.याच कालावधीत एका अवजड वाहनावर १७ फेब्रुवारी रोजी वाघोली वाहतूक शाखेच्या वतीने १५०० रुपयांची दंडात्मक कारवाई झाली आहे. मात्र याच कारवाईत अवजड वाहन दाखवू नये यासाठी वाहनचालक प्रतिनिधीकडून वेगळे वाहतूक पोलिसाने २७ हजार ५०० रुपये घेऊन वाहन सोडण्यात आले आहे. असा पुराव्यानीशी खुलासा सहायक पोलीस निरीक्षक राहुल कोळंबीकर यांचे समोर पैसे देण्याऱ्या संबंधित व्यक्तींने हजर राहून कारवाईतील आर्थिक तडजोडीचा प्रकार उघडकीस आणला आहे.त्यावेळेस जवळपास वाहन क्षमतेपेक्षा १० टन जादा ही बाब असताना देखील अवजड वाहन दाखवू नये यासाठी पोलिसांनी पैशाची मागणी करून बळजबरीने वेगळे पैसे घेऊन वाहन सोडण्यात आल्याची कबुली दिल्याने कारवाईत अनागोंदी कारभार उघडकीस आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांवर चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# वाढदिवसा दिवशीच नियतीचा क्रूर खेळ, धान्य भरडताना स्कार्फ अडकल्याने महिलेला मृत्यू




भोर । प्रतिनिधी

भोर तालुक्यातील कुरंगवडी गावात नशिबाचा क्रूर खेळ पाहायला मिळाला. घरात वाढदिवसाचा आनंद असताना एका भीषण अपघाताने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. शेतातील धान्यभरड यंत्रात स्कार्फ अडकून झालेल्या अपघातात ४१ वर्षीय शुभांगी नीलेश राऊत यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ही घटना शनिवारी (२१ फेब्रुवारी) सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. शुभांगी राऊत या कुटुंबीयांसह शेतात वाटाणा आणि मसूर भरडण्याचे काम करत होत्या. त्यावेळी धान्यभरड यंत्र वेगाने सुरू होते. काम करत असताना त्यांच्या डोक्याला बांधलेला स्कार्फ आणि केस अचानक यंत्रात अडकले. यंत्राचा वेग आणि ओढ इतकी प्रचंड होती की काही क्षणातच त्या यंत्राकडे खेचल्या गेल्या आणि गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी तातडीने त्यांना उपचारासाठी नसरापूर येथील खासगी रुग्णालयात हलवले. मात्र डॉक्टरांनी सर्व प्रयत्न करूनही त्यांचा जीव वाचू शकला नाही. विशेष म्हणजे, त्याच दिवशी शुभांगी राऊत यांचा ४१ वा वाढदिवस होता. घरात वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या जात असताना अचानक आलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली.

# मॅट्रिमोनिअल साईटवर ओळख पडली महाग; लग्नाच्या आमिषाने महिलेची ५९ लाखांची फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

विवाहविषयक संकेतस्थळावरील ओळखीतून एका महिलेस तब्बल ५९ लाख ३७ हजारांना फसवले असून याप्रकरणी चोरट्याविरुद्ध चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. फिर्यादीनुसार ४४ वर्षीय महिला नगर रस्ता भागतील वडगाव शेरीत राहायला आहेत. महिलेने एका विवाहविषयक संकेतस्थळावर नोव्हेंबर २०२४ मध्ये नावनोंदणी केली होती.

नावनोंदणीनंतर चोरट्याने महिलेशी संपर्क साधून विवाह करण्याबाबत उत्सुक असल्याचे सांगितले. त्यानंतर महिलेला जाळ्यात ओढले. वेगवेगळी कारणे देऊन चोरट्याने महिलकेडे पैसे मागण्यास सुरुवात केली. महिलेने खातरजमा न करता चोरट्याच्या खात्यात वेळोवेळी दीड वर्षात पैसे जमा केले. चोरट्याच्या खात्यात जवळपास ५९ लाख ३७ हजार रुपये जमा केले.महिलेने विवाहाबाबत विचारणा केल्यानंतर त्याने टाळाटाळ सुरु केली. महिलेला त्याने जिवे मारण्याची धमकी दिली. पैसे जमा केल्यानंतर चोरट्याने त्याचा मोबाइल बंद केला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक जगदाळे तपास करत आहेत.

विवाहाच्या आमिषाने फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. विवाहविषयक संकेतस्थळावर नावनोंदणी करताना महिलांनी संबंधित संकेतस्थळाबाबतची माहिती घ्यावी. अनोळखी व्यक्तीने आमिष दाखविल्यास खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पुरंदरकरांना दिलासा! तक्रारवाडी टोलनाक्यावर २० किमी परिसराला सवलत

पुरंदर

पुणे-पंढरपूर पालखी महामार्ग म्हणजे राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ वर तक्रारवाडी (ता. पुरंदर) या फाट्यावर होणाऱ्या टोलनाक्यावर २० किलोमीटर अंतरावरील गावांतील ग्राामस्थांना सवलत देण्यात येणार आहे.

याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पुणे विभागाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, अभिजित आवटे यांनी माहिती दिली. याबाबत संभाजी बिगेडचे शहराध्यक्ष संदीप जगताप, माजी प्रमुख विश्वस्त शिवराज झगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जेजुरी शहराध्यक्ष रमेश लेंडे, बहुजन हक्क परिषदेचे शहराध्यक्ष यशवंत दोडके यांनी सासवड-जेजुरी राष्ट्रीय महामार्गावर तक्रारवाडी फाट्याजवळ नव्याने झालेल्या टोलनाक्यावर पुरंदरमधील नागरिकांना टोलमाफी-सवलत मिळावी, याबाबत निवेदने देत पाठपुरावा केला.

यावेळी प्रकल्प अधिकारी संजय कदम, अभिजित आवटे यांनी शुक्रवारी (दि. २०) पुणे येथील कार्यालयात बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी पुरंदर पंचायत समितीचे माजी उपसभापती नीलेश जगताप, रमेश लेंडे, शिवराज झगडे, यशवंत दोडके, संदीप जगताप आदी उपस्थित होते. तक्रारवाडी फाट्यावरील टोलनाका बेलसर गावच्या हद्दीत येतो. मार्चअखेरीपर्यंत हा टाल सूर होणार आहे. पुरंदरमधील २० किलोमीटर परिसरातील नागरिकांना ३५० रुपयांचा मासिक पास देण्यात येणार आहे. त्यातून त्यांना कितीहीवेळा ये-जा करता येणार आहे.

त्यासाठी आधारकार्ड आणि फास्ट टॅग ऑनलाईन करून घ्यावे लागणार आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ३ हजार रुपयांचा वार्षिक पास घेतल्यास प्रत्येक टोलनाक्यावर फक्त १५ रुपये फास्टटॅगमधून वजा होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जेजुरी शहरांतर्गत राष्ट्रीय महामार्गावरील बंद असलेले पथदिवे १५ दिवसांमध्ये सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिली. तसेच टोलनाका सुरू करण्यापूर्वी पुन्हा एकदा बैठक घेऊन चर्चा करणार असल्याचेही सांगण्यात आले.

# पुण्यात उलगडला इतिहासाचा 'ज्ञानसागर'; भांडारकर संस्थेत दुर्मिळ हस्तलिखितांचे भव्य प्रदर्शन

पुणे । प्रतिनिधी

देशातील प्राचीन इतिहासाचे दस्तऐवज, साहित्यांचे, स्मारकांचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. ज्यासाठी भांडारकरसारख्या संस्था वर्षानुवर्षे चिकाटीने काम करीत आहेत, अशा कार्याला सरकारबरोबरच समाजाच्या दातृत्वाचीदेखील गरज असल्याचे मत पुणे महापालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी व्यक्त केले.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या संग्रहातील महत्त्वाची हस्तलिखिते, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचा तसेच संशोधन प्रकल्पांचा समावेश असलेल्या ज्ञानसागर प्रदर्शनाच्या



उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी खेलरत्न पुरस्कार विजेत्या ऑलिम्पिकपटू नेमबाज अंजली भागवत, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्मिता लेले, संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन, विश्वस्त प्रदीप रावत उपस्थित होते.

यावेळी महाभारत-सांस्कृतिक सूची या संशोधन प्रकल्पातील भीम या पुस्तकाचे प्रकाशनही महापौर यांच्या हस्ते करण्यात आले. येत्या २३ फेब्रुवारीपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. संशोधक तयार होण्यासाठी अशा प्रकारच्या प्रदर्शनांची गरज आहे. त्यामुळे तरुणांना या क्षेत्रात येण्याचे प्रोत्साहन मिळेल, असे मंजुषा नागपुरे यांनी सांगितले.जगातील सर्वात मोठे भांडार असलेली तिजोरी म्हणजे भांडारकर संस्था आहे. या संस्थेकडे असलेला प्राचीन साठा बहुमूल्य आहे, त्याचे सर्व समाजाला दर्शन व्हावे यासाठीचा हा ज्ञानसागर प्रदर्शनाचा उपक्रम स्तुत्य असल्याचे अंजली भागवत यांनी सांगितले.संशोधनाच्या क्षेत्रात गेली १०८ वर्षे कार्यरत असणार्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या कार्यात तरुणांचा सहभाग वाढला पाहिजे, असे अभय फिरोदिया यांनी सांगितले. समन्वयक मनोज एरंडे यांनी स्वागत, श्रीनन्द बापट यांनी सूत्रसंचालन तर संतोष रासकर यांनी आभार मानले.

# 'माझी वसुंधरा अभियान ५.०'मध्ये बारामतीचा पुन्हा राज्यात पहिला क्रमांक

बारामती: माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये बारामती नगरपरिषदेला सलग दुसऱ्या वर्षी राज्यात प्रथम क्रमांक मिळाला. शनिवारी (दि. २१) मुंबईत पुरस्कार प्रदान समारंभ पार पडला. पालिकेने हा पुरस्कार स्वीकारत तो दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अर्पण केला.

भूमी, जल, वायू, अग्नी आणि आकाश तत्त्वांवर आधारित राज्यस्तरीय स्पर्धेत ४० हजार ते १ लाख लोकसंख्या गटामध्ये बारामती नगरपरिषदेने अव्वल क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे 'माझी वसुंधरा अभियान ४.०' आणि ५.० अशी सलग दोन वर्षे बारामती नगरपरिषदेला हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. पर्यावरण संवर्धन, संरक्षण आणि जतन यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध कामाची ही राज्यस्तरीय पावती आहे.

हा मानाचा पुरस्कार डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे राज्यपाल



आचार्य देववत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. नगरपरिषदेकडून नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, तत्कालीन मुख्याधिकारी महेश रोकडे, विद्यमान मुख्याधिकारी पंकज भुसे व नगरसेवक, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला.विशेष म्हणजे, यावेळी नगरसेवक व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आम्ही अजितदादांचे वसुंधरा दूत असे लिहिलेल्या टोप्या परिधान करून उपस्थिती लावली होती. या प्रतीकात्मक कृतीतून त्यांनी अजितदादांप्रति कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या पर्यावरणपूरक विचारांना पुढे नेण्याचा संदेश दिला. पालिकेला मिळालेल्या या पुरस्कारामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि विकासाभिमुख विचार कारणीभूत आहे. त्यांनी पाहिलेलं स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बारामतीचे स्वप्न पुरस्काराच्या निमित्ताने साकार झाले.